नागपूर महानगरपालिकेच्या दि.15.09.2017 शुक्रवार रोजी दुपारी 12.30 वाजता राजे रघोजीराव भोसले नगर भवन, महाल येथे भरलेल्या स्थगित सर्वसाधारण सभेचे कार्यवृत्त

## उपस्थित सदस्य

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|---|---|
| 1. | **37** | **क** | **नंदा शरद जिचकार** | **महापौर** |
| 2. | **20** | **ड** | **दिपराज भैय्याजी पार्डीकर** | **उपमहापौर** |
| 3. | 1 | अ | महेन्द्रप्रसाद रमेश धनविजय | सदस्य |
| 4. | 1 | ब | सुषमा संजय चौधरी | सदस्या |
| 5. | 1 | क | प्रमिला प्रितम मथरानी | सदस्या |
| 6. | 1 | ड | विरेन्द्र उर्फ विक्की घनश्यामदास कुकरेजा | सदस्य |
| 7. | 2 | अ | भावना संतोष लोणारे | सदस्या |
| 8. | 2 | ब | दिनेश बसंतलाल यादव | सदस्य |
| 9. | 2 | क | नेहा राकेश निकोसे | सदस्या |
| 10. | 2 | ड | मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |
| 11. | 3 | अ | परसराम काशीनाथ मानवटकर | सदस्य |
| 12. | 3 | ब | गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| 13. | 3 | क | भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| 14. | 3 | ड | खान नसीम बानो मो. इब्राहिम | सदस्या |
| 15. | 4 | अ | निरंजना महेश पाटील | सदस्या |
| 16. | 4 | ब | शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य |
| 17. | 4 | क | मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या |
| 18. | 4 | ड | राजकुमार पुनाराम साहु | सदस्य |
| 19. | 5 | अ | दुर्गा चंद्रभुषण हत्तीठेले | सदस्या |
| 20. | 5 | ब | प्रविण विलासराव भिसीकर | सदस्य |
| 21. | 5 | क | अभिरूची अनिल राजगिरे | सदस्या |
| 22. | 5 | ड | संजय अरूणराव चावरे | सदस्य |
| 23. | 6 | अ | जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| 24. | 6 | ब | वंदना राजू चांदेकर | सदस्या |
| 25. | 6 | क | वैशाली अविनाश नारनवरे | सदस्या |
| 26. | 6 | ड | मो. इब्राहिम तौफीक अहमद | सदस्य |
| 27. | 7 | अ | विरंका मुरलीधर भिवगडे | सदस्या |
| 28. | 7 | ब | शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहीम | सदस्य |
| 29. | 7 | क | मंगला योगीराज लांजेवार | सदस्या |
| 30. | 7 | ड | संदीप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 31. | 8 | अ | आशा नेहरू उईके (आयेशा) | सदस्या |
| 32. | 8 | ब | अंसारी सय्यदा बेगम मो.निजामुद्दीन | सदस्या |
| 33. | 8 | क | जिशानमुमताज मो. इरफान अंसारी | सदस्या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 34. | 8 | ड | भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य |
| 35. | 9 | अ | स्नेहा विवेक निकोसे | सदस्या |
| 36. | 9 | ब | संजय श्यामराव बुर्रेवार | सदस्य |
| 37. | 9 | ड | नरेन्द्र नत्थुजी वालदे | सदस्य |
| 38. | 10 | अ | साक्षी विपीन राऊत | सदस्या |
| 39. | 10 | ब | रश्मि निलमनी धुर्वे | सदस्या |
| 40. | 10 | क | नितिश गंगाप्रसाद ग्वालबंशी | सदस्य |
| 41. | 10 | ड | गार्गि प्रशांत चोपरा | सदस्या |
| 42. | 11 | अ | संदिप चंद्रभान जाधव | सदस्य |
| 43. | 11 | ब | संगीता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 44. | 11 | क | अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| 45. | 11 | ड | भूषण कृष्णराव शिंगणे | सदस्य |
| 46. | 12 | क | हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| 47. | 12 | ड | जगदीश शिवदास ग्वालबंशी | सदस्य |
| 48. | 13 | अ | अमर हरीष बागडे | सदस्य |
| 49. | 13 | ब | रूतिका योगेश मसराम | सदस्या |
| 50. | 13 | क | परिणिता परिणय फुके | सदस्या |
| 51. | 13 | ड | वर्षा जयंत ठाकरे | सदस्या |
| 52. | 14 | अ | शिल्पा ईशांत धोटे | सदस्या |
| 53. | 14 | ब | प्रमोद ताराचंद कौरती | सदस्य |
| 54. | 14 | क | कमलेश दिलीप चौधरी | सदस्य |
| 55. | 14 | ड | प्रगती अजय पाटील | सदस्या |
| 56. | 15 | अ | सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य |
| 57. | 15 | ब | उज्वला प्रकाश शर्मा | सदस्या |
| 58. | 15 | क | रूपा शेखर राय | सदस्या |
| 59. | 15 | ड | संजय अनंत बंगाले | सदस्य |
| 60. | 16 | अ | लखन सुमेरा येरवार | सदस्य |
| 61. | 16 | ब | वनिता सुनिल दांडेकर | सदस्या |
| 62. | 16 | क | तारा (लक्ष्मी) ओमप्रकाश यादव | सदस्या |
| 63. | 16 | ड | संदीप दिवाकर जोशी | सदस्य |
| 64. | 17 | अ | विजय गोपालराव चुटेले | सदस्य |
| 65. | 17 | ब | लता सुनिल काडगाये | सदस्या |
| 66. | 17 | क | हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या |
| 67. | 17 | ड | प्रमोद छत्रपाल चिखले | सदस्य |
| 68. | 18 | अ | प्रवीण प्रभाकर दटके | सदस्य |
| 69. | 18 | ब | सुमेधा श्रीकांत देशपांडे | सदस्या |
| 70. | 18 | क | नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| 71. | 18 | ड | ऋषिकेश (बंटी) नारायण शेळके | सदस्य |
| 72. | 19 | अ | संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 73. | 19 | ब | विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| 74. | 19 | क | सरला कमलेश नायक | सदस्या |
| 75. | 19 | ड | दयाशंकर चंद्रशेखर तिवारी | सदस्य |
| 76. | 20 | अ | शकुंतला वामन पारवे | सदस्या |
| 77. | 21 | अ | ज्योती श्रीधर भिसीकर | सदस्या |
| 78. | 21 | ब | नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य |
| 79. | 21 | क | आभा विजयकुमार पांडे | सदस्या |
| 80. | 22 | अ | राजेश श्रावणजी घोडपागे | सदस्य |
| 81. | 22 | ब | वंदना वसंतराव यंगटवार | सदस्या |
| 82. | 22 | क | श्रद्धा विजय पाठक | सदस्या |
| 83. | 22 | ड | मनोज केशवराव चापले | सदस्य |
| 84. | 23 | अ | कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| 85. | 23 | ब | मनिषा आशिष धावडे | सदस्या |
| 86. | 23 | क | नरेंद्र (बाल्या) गोविंद बोरकर | सदस्य |
| 87. | 24 | अ | अनिल शौकीलाल गेंडरे | सदस्य |
| 88. | 24 | ब | सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| 89. | 24 | क | चेतना राजू टांक | सदस्या |
| 90. | 24 | ड | प्रदीप वसंतराव पोहाणे | सदस्य |
| 91. | 25 | अ | जयश्री योगेश्वर रारोकर | सदस्या |
| 92. | 25 | ब | पुरूषोत्तम नागोराव हजारे | सदस्य |
| 93. | 25 | क | वैशाली देवचंद रोहणकर | सदस्या |
| 94. | 25 | ड | दिपक मोतीरामजी वाडीभस्मे | सदस्य |
| 95. | 26 | अ | धर्मपाल नत्थुजी मेश्राम | सदस्य |
| 96. | 26 | ब | समीता राजेश चकोले | सदस्या |
| 97. | 26 | क | मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| 98. | 26 | ड | जितेंद्र धनराज कुकडे | सदस्य |
| 99. | 27 | अ | तानाजी सुकलाजी वनवे | सदस्य |
| 100. | 27 | ब | दिव्या दिपक धुरडे | सदस्या |
| 101. | 27 | क | वंदना राजेश भुरे | सदस्या |
| 102. | 27 | ड | हरिष सिताराम दिकोंडवार | सदस्य |
| 103. | 28 | अ | किशोर रतनलाल कुमेरिया | सदस्य |
| 104. | 28 | ब | मंगलाबाई प्रशांत गवरे | सदस्या |
| 105. | 28 | क | रेखा राजु साकोरे | सदस्या |
| 106. | 28 | ड | विजय शंकरराव झलके | सदस्य |
| 107. | 29 | अ | लीला अजय हाथीबेड | सदस्या |
| 108. | 29 | ब | विद्या योगेश मडावी | सदस्या |
| 109. | 29 | क | भगवान भाऊराव मेंढे | सदस्य |
| 110. | 29 | ड | स्वाती चंद्रकांत आखतकर | सदस्या |
| 111. | 30 | ब | रिता अशोक मुळे | सदस्या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 112. | 30 | क | स्नेहल सतीश बिहारे | सदस्या |
| 113. | 30 | ड | संजय मधुकर महाकाळकर | सदस्य |
| 114. | 31 | अ | उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| 115. | 31 | ब | सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| 116. | 31 | क | शीतल प्रशांत कामडे | सदस्या |
| 117. | 31 | ड | रविंद्र प्रभाकर भोयर | सदस्य |
| 118. | 32 | अ | अभय प्रल्हाद गोटेकर | सदस्य |
| 119. | 32 | ब | कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| 120. | 32 | क | रूपाली प्रशांतसिंह ठाकुर | सदस्या |
| 121. | 32 | ड | दिपक मारोतराव चौधरी | सदस्य |
| 122. | 33 | अ | वंदना भानुदास भगत | सदस्या |
| 123. | 33 | ब | भारती विकास बुंडे | सदस्या |
| 124. | 33 | क | विशाखा शरद बान्ते | सदस्या |
| 125. | 33 | ड | मनोजकुमार धोंडुजी गावंडे | सदस्य |
| 126. | 34 | अ | नागेश महादेव मानकर | सदस्य |
| 127. | 34 | ब | राजेन्द्र विठ्ठलराव सोनकुसरे | सदस्य |
| 128. | 34 | क | माधुरी प्रवीण ठाकरे | सदस्या |
| 129. | 34 | ड | मंगला शशांक खेकरे | सदस्या |
| **130.** | **35** | **अ** | **———————(रिक्त १०.४.२०१७ पासून)** | **रिक्त पद** |
| 131. | 35 | ब | जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| 132. | 35 | क | विशाखा प्रकाश मोहोड | सदस्या |
| 133. | 35 | ड | अविनाश निलकंठ ठाकरे | सदस्य |
| 134. | 36 | अ | मिनाक्षी नितीन तेलगोटे | सदस्या |
| 135. | 36 | ब | पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या |
| 136. | 36 | क | लहु दत्तुजी बेहते | सदस्य |
| 137. | 36 | ड | प्रकाश सिताराम भोयर | सदस्य |
| 138. | 37 | अ | प्रमोद हरिभाऊ तभाने | सदस्य |
| 139. | 37 | ब | सोनाली शालीक कडु | सदस्या |
| 140. | 37 | ड | दिलीप वामनराव दिवे | सदस्य |
| 141. | 38 | अ | उज्वला वसंतराव बनकर | सदस्या |
| 142. | 38 | ब | प्रफुल्ल विनोदराव गुडधे | सदस्य |
| 143. | 38 | क | प्रणिता चंद्रप्रकाश शहाणे | सदस्या |
| 144. | मानद सदस्य | | मा.श्री. अग्रवाल सुनिल जिवराज | सदस्य |
| 145. | मानद सदस्य | | मा.श्री.पोकुलवार गणेश उर्फ (मुन्ना) रामन्ना | सदस्य |
| 146. | मानद सदस्य | | मा.श्री.वानखेडे किशोर रामकृष्ण | सदस्य |
| 147. | मानद सदस्य | | मा.श्री.गांधी निशांत गिरीश | सदस्य |

## अनुपस्थित सदस्य

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|---|---|
| 1. | 9 | क | ममता महेश सहारे | सदस्या |
| 2. | 12 | अ | दर्शनी स्वानंद धवड | सदस्या |
| 3. | 12 | ब | माया चिंतामन इवनाते | सदस्या |
| 4. | 20 | ब | यशश्री देवराम नंदनवार | सदस्या |
| 5. | 20 | क | रमेश गणपती पुणेकर | सदस्य |
| 6. | 21 | ड | महेश केशवराव महाजन | सदस्य |
| 7. | 23 | ड | दुनेश्वर सूर्यभान पेठे | सदस्य |
| 8. | 30 | अ | नागेश गोविंदराव सहारे | सदस्य |
| 9. | मानद सदस्य | | रिक्त | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

श्री.अश्विन मुदगल, निगम आयुक्त
श्री.हरिश दुबे, निगम सचिव

महापौरः— सर्वांचे स्वागत आहे. सभेची कार्यवाही सुरू करण्यात येते.

**ठराव क्रमांक 93** :— मा. महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशानुसार निगम सचिव यांनी खालील अभिनंदन प्रस्ताव सभागृहात वाचून दाखविले व सभागृहाने त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मंजुरी प्रदान केली.

## अभिनंदन प्रस्ताव

### नितीन गडकरी

केंद्रीय मंत्री मा. ना. श्री. नितीन गडकरी यांना रस्ते परिवहन व जहाज बांधणी मंत्रालया सोबतच जलसंपदा, नदी विकास व गंगा पुनरूज्जीवन विभागाचे मंत्रिपद मिळाल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

### प्रा. अनिल सोले

माजी महापौर व विधान परिषद सदस्य प्रा. अनिल सोले यांची विधिमंडळाच्या विविध समित्यांवर निवड झाली असून आश्वासन समितीच्या प्रमुखपदाची जबाबदारी त्यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. याशिवाय विशेष हक्क समिती, मराठी भाषा समिती, अशासकीय विधेयक समिती, ग्रंथालय समिती या समित्यांच्या सदस्यपदी त्यांची निवड करण्यात आल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

### स्वाती महाडिक

उत्तर काश्मीरच्या कुपवाडा येथे 17 नोव्हेंबर, 2015 रोजी अतिरेक्यांचा हल्ला परतावून लावताना महाराष्ट्राच्या सातारा येथील कर्नल संतोष महाडिक यांना वीरमरण आले. परंतु पती निधनाचे दुःख बाजुला ठेवून स्वतःला सावरत देशसेवेचा निर्धार मनाशी बाळगुन त्यांच्या वीरपत्नी स्वाती महाडिक यांनी लष्करात सहभागी होण्याचा निर्णय घेतला आणि लष्कराचे 11 महिन्याचे खडतर प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करून

भारतीय लष्करात लेफ्टनंट पदावर रूजू होवून समाजासमोर एक आदर्श घालून दिल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**<u>डॉ. मीनल सांगोळे</u>**

मूकबधिराचा आवाज म्हणून गेल्या 25 वर्षांपासून मूकबधिर विद्यालयातील शिक्षिका डॉ. मीनल सुधीर सांगोळे यांना उत्कृष्ठ शिक्षक म्हणून राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**<u>हेमंत गांधी</u>**

नाग विदर्भ चेंम्बर ऑफ कॉमर्स (एनव्हीसीसी) च्या अध्यक्षपदी हेमंत गांधी यांची निवड झाल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**<u>सुधाकर आमधरे / मनिषा मोगलेवार /अशोक चौधरी</u>**

शिक्षक दिनाचे औचित्य साधून मनपाच्या संजयनगर हिंदी माध्यमिक शाळेचे सुधाकर आमधरे, मनिषा मोगलेवार, अशोक चौधरी यांना 'आदर्श शिक्षक' पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**<u>दिव्या देशमुख</u>**

ब्राझीलच्या पोसोक डी– काल्डास शहरात पार पडलेल्या विश्व कॅडेट बुद्धीबळ चॅम्पियनशिपमध्ये 12 वर्षाखालील गटात जेतेपद पटकावून नगरीचा नावलौकीक वाढविल्याबद्दल दिव्या देशमुख यांचे नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**<u>गौरी कोढे</u>**

अवघ्या 12 वर्षाच्या गौरी कोढे या नागपूरकन्येने एका मिनिटात सर्वाधिक वस्तूंचा क्रम लक्षात ठेवून गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये स्वतःच्या नावाची नोंद करून नगरीचे नांवलौकीक केल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

महापौर :– सन्माननिय सदस्य, प्रश्नोत्तराचा तास सुरु करीत आहे. प्रत्येक सदस्यांना 6 मिनीटांचा वेळ देण्यात येणार आहे.

**<u>प्रश्न क्र. 28</u>** :– झोननुसार नागपूर शहरात किती डस्ट बिन वाटप करण्यात आले आहे त्या संदर्भातील प्रश्न

श्री.बंटी शेळके :– मा.महापौर महोदया, मी विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर मला समाधानकारक मिळालेले नाही, उत्तराचे स्पष्टीकरण सांगण्यात यावे.

महापौर :– प्रशासनाने स्पष्टीकरण दयावे.

वैद्यकीय अधिकारी, (एस) (श्री.दासरवार) :– मा.महापौर महोदया, मा.नगरसेवकांनी विचारलेला प्रश्न असा आहे की, आजपर्यत घरोघरी कचरा गोळा करण्याकरिता झोन नुसार शहरात किती डस्टबीन वाटप करण्यात आले व हे डस्टबिन मोफत किंवा विकत देणार आहेत काय? नागपूर महानगरपालिकेत सद्यस्थितीत प्रत्येक झोननिहाय 9,960 जोडया डस्टबिन वाटप करण्यात आले आहे.

श्री.बंटी शेळके :– मा.महापौर महोदया, ज्या 9,960 डस्टबिनच्या जोडया वाटण्यात आलेल्या आहेत त्याची काही निविदा आपण काढली होती काय ? आपण जे 24 लाख 80 हजारांचे डस्टबिन वाटले आहेत आपण महानगरपालिकेत कुठलाही व्यवहार करीत असेल किंवा जनतेचा पैसा वापरुन डस्टबिन वाटले असेल तर त्या संदर्भात काही निविदा काढल्या होत्या काय ? म्हणजे कोणत्या बेसिस वर वाटण्यात आलेल्या आहेत.

वैद्यकीय अधिकारी (एस) (श्री.दासरवार) :– मा.महापौर महोदया, डी.जी. एस.एन.डी. चे जे दर होते त्या मध्ये आयुक्तांची मंजुरी घेवून ते घेण्यात आले.

श्री.बंटी शेळके :– मा.महापौर महोदया, डस्टबिन वाटलेल्या प्रत्येक झोनची यादी आपल्या कडे आहे काय ? की या झोन मध्ये आपण इतके डस्टबिन वाटले आहेत अशी आपल्याकडे प्रत्येक झोनची यादी आहे काय?

वैद्यकीय अधिकारी (एस) (श्री.दासरवार) :– मा.महापौर महोदया, झोन क्र 1 – 1000 डस्टबिन जोडया, झोन क्र 2 – 980 डस्टबिन जोडया, झोन क्र 3 – 1000 डस्टबिन जोडया, झोन क्र 4 – 1000, डस्टबिन जोडया, झोन क्र 5 – 1000 डस्टबिन जोडया, झोन क्र 6 – 1000 डस्टबिन जोडया, झोन क्र 7 – 1000 डस्टबिन जोडया, झोन क्र 8 – 1000, डस्टबिन जोडया, झोन क्र 9 –1000, डस्टबिन जोडया, झोन क्र 10 – 980 डस्टबिन जोडया वाटण्यात आलेल्या आहेत.

श्री.बंटी शेळके :– मा.महापौर महोदया, एका डस्टबिन जोडीची किंमत किती आहे.

वैद्यकीय अधिकारी (एस) (श्री.दासरवार) :– मा.महापौर महोदया, एका जोडीची किंमत 124 रुपये आहे.

श्री.बंटी शेळके :– मा.महापौर महोदया, आपण ओला आणि सुखा कचरा वेगवेगळा करायला लावला आहे त्यानंतर कनकच्या ज्या गाडया शहरामध्ये फिरत आहे त्यामध्ये कच–याचे वर्गीकरण त्यामध्ये करीत आहे आणि वर्गीकरण करीत असतांना जेथे आपण कचरा फेकत आहे तेथे वर्गीकरण करीत आहे अशा ज्या गाडया आहेत त्या शहरामध्ये किती आहेत ?

वैद्यकीय अधिकारी, (एस) (श्री.दासरवार) :– मा.महापौर महोदया, वर्गीकरण करण्याकरिता ज्या टाटा एस गाडया आहे त्या 40 तयार केलेल्या आहेत वर्गीकरणा करिता आणि रिक्षा 480 आहे ते वर्गीकरण करण्याकरिता तयार केलेले आहेत.

श्री.बंटी शेळके :– मा.महापौर महोदया, वर्गीकरण करण्याकरिता ज्या आपण गाडया तयार केलेल्या आहेत त्यामध्ये ओला आणि सुखा कचरा त्यामध्ये जातो काय? माझ्या प्रभागामध्ये 17,000 हजार घरे आहे त्यामध्ये आपण आपल्याकडुन वृत्तपत्राच्या माध्यमातून माहिती मिळाली होती की स्वच्छेने आपण डस्टबिन विकत घ्यावे व ते आमच्या प्रभागातील लोकांनी विकत सुध्दा घेतले त्यांच्या येथे जे ओला आणि सुखा कच–याचे वर्गीकरण केले आहे तो कचरा टाटा एस गाडी मध्ये येत नाही त्याच्याकरिता समोर कुठली उपाययोजना करणार आहे काय?

वैद्यकीय अधिकारी, (एस)(श्री.दासरवार) :– मा.महापौर महोदया, सद्यस्थितीत काही लिमिटेड घरांपासून सुरुवात करीत आहे. पुर्ण नागपूर शहरात 1,58,000 घरे निश्चित केले आहे त्यापैकी 18,966 घरांमधून आपण वर्गीकृत करुन कचरा घेत आहे.

श्री.बंटी शेळके :– मा.महापौर महोदया, जेव्हा सभागृहामध्ये डस्टबिनचा विषय आला होता. जेवढे येथे मा. नगरसेवक बसले आहे त्यांच्या घरी स्लम मधले असो किंवा चांगल्या भागात राहणारे लोक नगरसेवकांच्या घरावर चालुन येत आहे तर त्याचे उत्तर कोणी दययाचे ? या विषयाला इतके महिने झाले आहे तर यामध्ये 9960 या हिशोबाने आपण डस्टबिन वाटत असेल तर शहरामध्ये 11 लाख डस्टबिन आपण वाटणार आहे तर या हिशोबाने आपण जर गेलो तर तीन ते चार कार्यकाळ नगरसेवकांचा त्यामध्ये जाईल म्हणजे 15 ते 20 वर्ष लागतील 11 लाख डस्टबिन आपण केव्हापर्यंत वाटु.

वैद्यकीय अधिकारी (एस) (श्री.दासरवार) :– मा.महापौर महोदया, आता निविदा प्रक्रीया करुन डस्टबिन खरेदी करीत आहे. परवाच मा.स्थायी समितीचा यामध्ये निर्णय झालेला आहे त्यानुसार पुढील प्रक्रीया करीत आहे.

श्री.बंटी शेळके :– मा.महापौर महोदया, 38 प्रभाग आपल्याकडे आहे आणि आमचा प्रभाग क्र 18 मध्ये एकच टाटा एस. ची गाडी आहे. 200 डस्टबिन वाटल्या ते वाटल्यानंतर त्यामध्ये कोणत्या कोणत्या व्यक्तीला त्या डस्टबिन वाटल्या आहेत त्याची यादी आपल्याकडे आहे काय?

वैद्यकीय अधिकारी (एस) (श्री.दासरवार) :– मा.महापौर महोदया, झोनमध्ये डस्टबिनची यादी उपलब्ध आहे.

श्री.बंटी शेळके :– मा.महापौर महोदया, झोन मध्ये ती यादी उपलब्ध नाही, माझ्या समक्ष सिगांडा मार्केटमध्ये चांदणीपूरामध्ये तेथे मा.माजी महापौर प्रविणजी दटके पण होते मा.सभापती सुमेधा देशपांडे पण होत्या तेथे कुठल्याच प्रकारची नोंद घेतली गेली नाही. शहरामध्ये 9,960 डस्टबिन आपण वाटले तर त्याची नोंद आपल्या झोनमध्ये नाही आहे जर झोनमध्ये नोंद असेल तर यादी उपलब्ध करण्यात यावी.

श्री.प्रविण दटके :– पाईट ऑफ इन्फॉर्मेशन मा.महापौर महोदया, आम्ही चौघांनी मिळून डस्टबिन वाटले सिंगाडा मार्केटला त्यामध्ये, देवानंद नावाचा कर्मचारी आहे त्यांनी रजिस्टर वर नोंद घेतली आहे. फक्त डस्टबिन वाटतांना नोंद नाही घेतली नंतर ती घरोघरी जावून नोंद घेतली. मा.सदस्यांचे म्हणणे एकदम बरोबर आहे वाटत असतांना आधार कार्ड आणि नोंद घेतली नव्हती मग सर्वांच्या घरोघरी जावून रजिस्टर वर त्यांच्या

सहया आणल्या आहेत. नाही तर उद्या कळणारच नाही कोणाला डस्टबिन दिली कोणाला नाही दिली. पण जेथे आपण वाटल्या तेथे नोंद घेतली नव्हती.

श्री.बंटी शेळके :– मा.महापौर महोदया, डस्टबिन मध्ये जो 24 लाख 80 हजार रुपये खर्च करण्यात आला त्यामध्ये निविदा काढल्या का नाही? मा.आयुक्तांच्या ते निर्देशनास आणले त्यांचे पत्र घेतले. काही पण करायच्या अगोदर आपण निविदा काढतो तर निविदा काढायला पाहिजे होती की नाही.

वैद्यकीय अधिकारी (एस) (श्री.दासरवार) :– मा.महापौर महोदया, डि.जी.एस.एन.डी. वरती आर.सी. रेट होते त्या रेटवर ते खरेदी करण्यात आले आहे.

श्री.बंटी शेळके :– मा.महापौर महोदया, नगरसेवकांच्या घरावर जे आज लोक चालले त्यांना असे वाटत आहे की नगरसेवकांनी डस्टबिन खाल्ले त्यावर प्रशासनाकडून प्रसार माध्यमाच्या माध्यमातून काही उत्तर देणार आहेत काय?

वैद्यकीय अधिकारी (एस) (श्री.दासरवार) :– मा.महापौर महोदया, झोनला निर्देश दिले होते सद्यस्थितीत डस्टबिनची खरेदी टेन्डरची प्रक्रीया पुर्ण करुनच ते खरेदी करणार आहेत.

श्री.बंटी शेळके :– मा.महापौर महोदया, केव्हा 2022 मध्ये

वैद्यकीय अधिकारी (एस) (श्री.दासरवार) :– मा.महापौर महोदया, याच महिन्यात ती सर्व प्रक्रीया पुर्णत्वास येईल.

श्री.बंटी शेळके :– मा.महापौर महोदया, 4 महिन्याचा कालावधी झाला. सर्व लोकांच्या आशा अपेक्षा नगरसेवकांकडून उंचावल्या आहेत त्यामुळे जे नविन नगरसेवक आहे आणि जुने नगरसेवक आहे त्यांच्या जवळ सर्व नागरिक आशा व अपेक्षा घेवून जात आहे आपण डस्टबिनच्या संदर्भात मोठमोठाल्या घोषणा केल्या. माझ्या प्रभागात 17 हजार लोक त्यापैकी 10 हजार लोक आहेत आमच्या घरावरती आले डस्टबिन गेले कुठे म्हणुन याचे उत्तर कोण देणार आहे.

महापौर :– सन्माननिय सदस्य, विभागाकडून डस्टबीन वाटपाची प्रोसेस सुरू आहे. उर्वरित डस्टबीन वाटपाकरिता निविदा सुध्दा काढण्यात आल्या आहेत. प्रशासनाने या कामाकडे लक्ष घालून संपुर्ण डस्टबीनचे वाटप त्वरित पुर्ण करावे.

**<u>प्रश्न क्र 29</u>** :– ऐवजदार रोजंदारी कर्मचाऱ्यांना स्थायी करण्या संदर्भातील प्रश्न

श्री.मनोज सांगोळे :– मा.महापौरजी, ऐवजदारांचा हा जीवन मरणाचा प्रश्न आहे या देशातील अनेक मान्यवर महापुरुष होवून गेले त्यांच्या नावांनी अनेक योजना आपण पिडीत लोकांसाठी राबवितो, जे या शहराच्या विकासाच्या स्वच्छतेचे काम करीत आहे त्याच्यावर माजी महापौर प्रविणजी दटके यांनी स्वच्छता दुत म्हणुन त्यांना पुरस्कृत केले अशा ऐवजदारांच्या पिडीत लोकांची कहानी जरा वेगळीच आहे त्यांच्या घरची परिस्थिती ऐवढी भयंकर आहे की जेवढे मृतक झालेले सफाई कर्मचारी आहे त्यांच्या घराचे वाटोळे लागून गेले आहे, त्यांचा आधार गेलेला आहे आणि दरवर्षी मा.संदीपजी जोशी यांचा जन्मदिवस मनविण्यात येतो त्यामध्ये म्हटले आहे भव्य रक्तदान शिबिर ऐवजदार सफाई कामगार संमेलन आणि त्यांना स्थायी करण्याकरिता प्रयत्नशील राहून, गेल्या अनेक वर्षापासून त्यांचा जन्मदिवस मनविण्यात येत आहे ते ऐवजदारांकरिता प्रयत्न करतात त्यामध्ये तिळमात्र शंका नाही. ऐवजदार कर्मचाऱ्यांसाठी ते सरकारशी भांडतात आपल्या पत्रकाच्या माध्यमातून, परंतु नगरविकास खाते त्यांचे ऐकते की नाही ऐकत यामध्ये प्रश्नचिन्ह निर्माण होते माझी विनंती आहे या गोर गरीब हे शहराच्या स्वच्छतेकरिता काम करणारे स्वच्छतादुत यांना स्थायी करावे आणि अनुकंपाचा बेस लाड पागे समिती व्दारा लावण्यात यावा अशी माझी आपणास कळकळीची विनंती आहे. दिल्ली सरकारमध्ये एक केजरीवाल नावाचे मा.मुख्यमंत्री आहे त्यांनी अस्थायी कर्मचारी, ठेकेदारी पध्दतीमध्ये काम करणारे कर्मचारी आणि तासिका बेसवर काम करणारे जे टिचर होते त्यांना परमनंट केले ते छोटेसे केंद्र शासित राज्य आहे मग ते करु शकते तर आपण का नाही, मग आपण सक्षम नाही काय? आपले राज्य सरकार सक्षम नाही काय? मला थोडेसे शंका निर्माण झाली, आपणास विनंती आहे आपल्या माध्यमातून व मानवतेच्या दृष्टीकोनातुन त्यांना स्थायी करावे आणि त्यांच्या मृतक कर्मचाऱ्यांना पुन्हा नविन कार्ड तयार करुन त्यांना स्थायी करण्यात यावे अशी सभागृहाच्या माध्यमातून विनंती आहे.

श्री.कमलेश चौधरी :– पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन मा.महापौरजी, निश्चितरुपसे बडे सुंदर तरीके से यहा पर मा.सदस्य श्री.मनोज सांगोळे ने यहापर विषय रखा किस तरहा से इनको परमनंट करना चाहिये। और यहा

बैठे हुये काफी सदस्य है हमारे सत्तापक्ष नेता श्री.संदीपजी के पत्रक मे भी यह छपा हुवा है बहोत अच्छी चिज है लेकिन इस के साथ साथ हमारा ऐसा मानना है की उन लोगोको सिनॅरिटी दि जाये आप उनको किसी भी प्रकार से सिनॅरिटी देते है तो उसमे काफी लोग रिटायरमेंट की स्टेज पर है उनको हम परमनंट भी करते है तो रिटायरमेंट होने के स्टेज पर है आज अगर हम उनको परमनंट का प्रस्ताव देते है तो शायद महिने दो महिने मे बहोत सारे लोग रिटायर्ड हो जायेंगे उन लोगो का विचार करना चाहिये की जिन लोगो को सिनॅरिटी दि जाती है तो कम से कम पेंशन का जो फायदा है उनको मिल सके। इनमे काफी लोग ऐसे है दो–दो तिन–तिन महिने रिटार्यमेंट को बचे है अगर वो लोग रिटायर्ड होते है तो परमनंट करने का विषय यहा पर लेकर बैठे हुये है इन चिजो का फायदा उनको नही मिल पायेंगा तो इसलिये इसके साथ साथ परमनंट के साथ साथ इसमे सिनॅरिटी का विचार करते हुये इस प्रस्ताव को निश्चित रुप से करे ऐसा मे आपसे निवेदन करना चाहुॅगा।

श्री.तानाजी वनवे :– मा.महापौर महोदया, हा जो प्रश्न मा.मनोज भाऊंनी या ठिकाणी उपस्थित केला आणि चौधरीजी बोलले माझी सत्तापक्ष नेते आणि मा.महापौर आणि सभागृहाला विनंती आहे, अत्यंत गंभीर प्रश्न आहे अनेक स्वच्छतादुत आपल्या भागामध्ये काम करतात आणि ज्यांच्यामुळे आपण स्वच्छता अभियान घेतो त्याच्यामुळे पुर्ण शहर या ठिकाणी स्वच्छ राहते अशा ऐवजदारांचा आपण गंभीरतेने विचार करुन त्यांना स्थायी करण्यासोबत त्यांना रिटायरमेंटला कमी दिवस राहिले आहे आजच सकाळी हा प्रस्ताव बघून मला सफाई कर्मचाऱ्यांचे शिष्टमंडळ भेटले त्या लोकांना आपण त्वरीत स्थायी करुन त्या लोकांना सुविधा आपण उपलब्ध करुन दयाव्यात अशी मी आपणांस विनंती करतो.

श्री.संदीप जोशी :– मा.महापौर महोदया, या पुर्वीच या संपूर्ण विषयावरती चर्चा देखील झालेली आहे आणि हा प्रस्ताव सुध्दा पारीत झालेला आहे महाराष्ट्र शासनाला प्रस्ताव सुध्दा गेलेला आहे माझ्या माहितीप्रमाणे दोन–तीन दिवसापूर्वीच मा.महापौरांचे पत्र या निमित्त महाराष्ट्र शासनाला गेले आहे की नविन आकृतीबंधामध्ये यांचा समावेश करण्यात यावा. मला असे वाटते आपण सर्वांना एकदा मा.मुख्यमंत्र्यांशी आणि महाराष्ट्र शासनाशी आपल्याला पाठपुरावा करावा लागेल आपण सर्व मिळून तो आपण करुया, हा विषय जो आहे तो तुमच्या आमच्या सर्वाच्यांच जवळचा विषय आहे. खरोखर चांगल्या पध्दतीने ही मंडळी काम करीत आहे त्यांच्यासाठी आपण सर्वजण पाठपुरावा करुया, ऐवढेच या ठिकाणी आपणांस सांगू इच्छितो आणि त्याचबरोबर मृतक कर्मचा–यांचे जे काही वारस आहे त्यांचा कार्डचा जो विषय आहे त्यांचा देखील पाठपूरावा करावा.

श्री.हरीश ग्वालबंशी :– मा.महापौर महोदया, जो मृतक सफाई कर्मचारी है उनके परिवार के सदस्य को भी यहापर लिया जायें।

महापौर :– सन्माननिय सदस्य, आकृतीबंधामध्ये सफाई कर्मचा–यांच्या संदर्भात सर्व गोष्टीचा समावेश करण्यात आला आहे. त्याचा पाठपुरावा करण्यात येत आहे. लवकरच आपल्याला या कामात यश येवून हा प्रश्न मार्गी निघेल.

**<u>प्रश्न क्र 31</u>** :– ऐवजदार रोजंदारी कर्मचाऱ्यांना स्थायी करण्या संदर्भातील प्रश्न

श्री.संदीप सहारे :– मा.महापौरजी, मा.सरोजताई खापर्डे या राज्यसभेचे खासदार असतांना त्यांनी सन 2000 मध्ये उत्तर नागपूर मध्ये युवकांनी खेळांच्या माध्यमातून आपली प्रगती करावी या करिता एक स्पोर्ट कॉम्पलेक्स बनविण्याकरिता महानगरपालिकेला 80 लाख 25 हजार रुपये दिले होते काही वर्षानंतर तो स्पोर्ट कॉम्पलेक्स तयार झाला आणि स्पोर्ट कॉम्पलेक्स तयार झाल्यानंतर त्या स्पोर्ट कॉम्पलेक्समध्ये खेळांची गतिविधी सुरु न करता तो स्पोर्ट कॉम्पलेक्स ओ.सी.डब्लु. ला देण्यात आले त्याच्या मागचे कारण काय ते मला मिळालेल्या उत्तरामध्ये स्पष्ट नाही आहे आणि म्हणुनच ते कार्यालय ओ.सी.डब्लु. ला का दिले तेथे स्पोर्ट च्या गतिविधी सुरु न करता तेथे त्यांचे कार्यालय थाटण्याकरिता का दिले त्याचे कारण सभागृहामध्ये त्यांनी सांगावे.

महापौर :– प्रशासनानी माहिती दयावी.

कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) श्री.गायकवाडः– मा.महापौर महोदया, आपल्या ओ.सी.डब्लु. ला जो कॉन्ट्रॅक्ट दिला त्यामध्ये आपल्याला त्यांच्या ऑफीस करिता जागा प्रोव्हाईड करायची आहे त्यामध्ये प्रोव्हीजन आहे प्रत्येक झोनला कस्टमर केअरसाठी जागा प्रोव्हाईड करायची आहे आणि ही जागा प्रोव्हाईड करतांना आधी आपले कार्यालय झोनमध्ये होते परंतु झोनमध्ये असतांना त्यावेळेस ब.स.पा. पक्षाचे जे अध्यक्ष होते त्यांनी आपल्या झोनमध्ये विनंती केली होती की झोन कार्यालयामध्ये जास्त गर्दी होते आणि तेथील जे बुध्दपार्क आहे

तेथे असामाजिक तत्वांचे तेथे वापर होतो तेथे फक्त एकच हॉल सुरु आहे म्हणुन त्या ठिकाणी ऑफीस शिफ्ट करा अशी विनंती केली आणि त्याला मा.आयुक्तांनी मार्च 2016 मध्ये मान्यता दिली.

श्री.संदीप सहारे :– मा.महापौर महोदया, मी एक पत्र देतो की आशीनगर झोनमध्ये हॉल फुटबॉल खेळण्याकरिता उपलब्ध करण्यात यावे देतील काय ? यांनी सांगितले की एका नगरसेवकांच्या पत्रावरुन ते दिले तर मी या सभागृहामध्ये मागणी करतो की आशीनगर झोनमध्ये जागा मला फुटबॉल कबडड्ी खेळण्याकरिता दयावे तर देणार आहेत काय?

कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) श्री.गायकवाड :– मा.महापौर महोदया, झोनतर्फे जो प्रस्ताव आला होता तो मी वाचून दाखवितो.

श्री.संदीप सहारे :– मा.महापौर महोदया, प्रस्ताव माझ्याकडे पण आहे तो नका वाचू.

कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) श्री.गायकवाड :– मा.महापौर महोदया, झोनच्या कार्यालयामध्ये जागा अपूरी पडत होती.

श्री.संदीप सहारे :– मा.महापौर महोदया, पहिले तर यांनी सांगितले की नगरसेवकांनी पत्र दिले म्हणून ती जागा दिली तर मी पत्र देतो की मला आशीनगर झोन फुटबॉल खेळण्याकरिता देणार काय? याचे उत्तर देण्यात यावे.

कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) श्री.गायकवाड :– मा.महापौर महोदया, त्यांनी पत्र दिल्यानंतर झोनच्या पी.डब्लु.डी. कडुन व सहा.आयुक्तांकडुन रिकमंडेशन म्हणून ती जागा देण्यात आली.

श्री.संदीप सहारे :– मा.महापौर महोदया, झोनतर्फे रिकमंडेशन आले ते नगरसेवकांच्या पत्रावर ना ?

कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) श्री.गायकवाड :– मा.महापौर महोदया, झोनची जागा खरोखर कमी पडत होती आणि तेथे असामाजिक तत्वाचा वापर होत होता.

श्री.संदीप सहारे :– मा.महापौर महोदया, जागा कमी पडत होती तर ते स्पोर्ट कॉम्पलेक्सच भेटल होत काय ? महानगरपालिकेला इतक्या मोठया स्पोर्ट कॉम्पलेक्स मध्ये स्पोर्ट ॲक्टीव्हीटी का सुरु केल्या नाही. तिथल्या झोननी स्पोर्ट ॲक्टीव्हीटी सुरु करा म्हणुन पत्र का दिले नाही मग तेथे असामाजिक तत्व तेथे वावरत होते मग त्या जागेवर स्पोर्टच्या गतिविधी सुरु करायला पाहिजे होत्या ते का आपण नाही केले.

कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) श्री.गायकवाड :– मा.महापौर महोदया, झोनतर्फे रिकमंडेशन आले आणि ते स्पोर्ट कॉम्पलेक्स रिकामे पडले होते फक्त तेथे एकच बॅडमिंटन कोर्ट सुरु होते.

श्री.संदीप सहारे :– मा.महापौर महोदया, एखादया जागेचा जर आम्ही युजर चेंज करीत आहे जर तेथे स्पोर्ट कॉम्पलेक्स आहे आणि तेथे ऑफीस थाटत आहे तर नियमाप्रमाणे कलम 79 (क) मध्ये दिलेले आहे की आयुक्तही ते देवु शकत नाही जो पर्यत महानगरपालिकेच्या सभागृहाची मंजुरी घेत नाही तो पर्यत आयुक्तांनाही देण्याचा अधिकार नाही आणि त्यानंतरही जर तुम्ही अशा प्रकारचे कृत्य करीत असेल तर ते बरोबर नाही म्हणुनच मा.महापौर साहेब याच्याआधी मी या सभागृहामध्ये मागच्या वेळला एक पोकलॅण्डचा प्रश्न विचारात घेतला होता तो पोकलॅण्ड पिवळीनदी आणि चांभार नाला साफ करण्याकरिता विना टेन्डरनी अवस्थी नावाच्या ठेकेदाराला कॉट्रॅक दिला. तशाच प्रकारे या सभागृहामध्ये विषय न आणता त्या स्पोर्ट कॉम्पलेक्सचे युजर चेंज न करता त्यांनी परस्पर देवून टाकले म्हणजे आपण या पदावर बसले आहे या सभागृहाचा मान करण्याची इच्छा नाही काय असे वेळोवेळी येथे प्रश्न उपस्थित होत आहे त्यांची इच्छा नव्हती काय की उत्तर नागपूरच्या युवकांना खेळांचा मंच मिळाला पाहिजे म्हणून मी मा.स्थायी समिती अध्यक्षांना विनंती करतो की त्यांनी त्या स्पोर्ट कॉम्पलेक्स करिता त्यांनी निधी दयावा त्यांनी लवकरात लवकर तेथून ओ.सी.डब्लु. चे ऑफीस हलविण्यात यावे, मला आशा आहे की आपण तसे आदेश या सभागृहामध्ये दयावे.

महापौर :– सन्माननिय सदस्य, आपण लक्षात आणुन दिलेल्या बाबीनुसार प्रशासनाने तेथे जावून पाहणी करावी आणि ओ.सी.डब्लु. ऑफीस बद्यल जो काही निर्णय घ्यायचा आहे तो पाहणी केल्यानंतर निर्णय घेण्यात येईल.

श्री.संदीप सहारे :– मा.महापौर महोदया, तेथे ऑलरेडी ऑफीस आहेच ना? आपण आदेश दयावे ते ऑफीस हलविण्यात यावे.

महापौर :– कॉट्रॅक्ट मध्ये दिले आहे की त्यांना ऑफीस करिता जागा दयायची आहे.

श्री.संदीप सहारे :– मा.महापौर महोदया, सरोजताई खापर्डेनी निधी कशासाठी दिला होता स्पोर्ट

कॉम्पलेक्स बनविण्याकरिता मग यांनी बनविले काय? ज्या प्रमाणे ओ.सी.डब्लु. चे ऑफीस आशीनगर झोनमध्ये सुरु होते तसेच तेथे ऑफीस थाटण्यात यावे किंवा दुसरी जागा पहायला पाहिजे, जर आपण या शहरातील युवकांना खेळांच्या माध्यमातून वाढवायची इच्छा नसेल तर मग तसे सांगा नाहीतर सभागृहामध्ये आपण आदेश दया की त्यांनी जे ऑफीस थाटले आहे त्यांनी ते रिकामे करावे.

महापौर :– यामध्ये प्रशासन लक्ष घालेल आणि त्यावर आपणही प्रयत्न करु

श्री.संदीप सहारे :– मा.महापौर महोदया, आपण आदेश दयावे.

महापौर :– यावर प्रशासनाकडून माहिती येवू दयावे

निगम आयुक्त :– मा.महापौर महोदया, काही पर्यायी जागा उपलब्ध आहे किंवा कसे त्याच्याबाबतीत माहिती घेवून मा.महापौर मॅडमला अहवाल सादर करण्यात येईल.

श्री.संदीप सहारे :– मा.महापौर महोदया, ज्या प्रमाणे आधी आशीनगर कार्यालय होते त्याचप्रमाणे ते कार्यालय तेथे थाटण्यात यावे.

महापौर :– मा.सदस्यांनी बाब लक्षात आणून दिलेली आहे. त्या अनुषंगाने प्रशासनाने तेथे जावून पाहणी करावी. ओसीडब्लू चे ऑफीस दुसरीकडे हलविण्याबाबत पाहणी करून निर्णय घ्यावा.

**<u>प्रश्न क्र 32</u>** :– महानगरपालिकाने रेन वॉटर हार्वेस्टींग योजना में सबसीडी की घोषणा कब की गई थी? संदर्भातील प्रश्न

श्री.निशांत गांधी :– मा.महापौर महोदया, मै चाहता हुॅ की इस विषय पर संबंधित अधिकारी और प्रकाश डाले।

महापौर :– यामध्ये मा.सदस्य आपणास काय अपेक्षित आहे.

श्री.निशांत गांधी :– मा.महापौर महोदया, इस संदर्भ अधिक जानकारी दी जाये ंतो अच्छा होगा। ही योजना 1 एप्रिल 2015 ला लागू झाली होती ते लागू होवुन अडीच वर्ष झाले अजून पर्यत फक्त 68 लाभार्थी आहे या संदर्भात मला वाटते की याच्या प्रसारात अधिकारी व प्रशासन कमी पडले आहे.

श्री.मेश्राम (सहा.आयुक्त) :– मा.महापौर महोदया,सन्माननिय सभागृह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 40 (ब) अंतर्गत ज्या इकॉलॉजिकल सिस्टम आहे त्या करिता मालमत्ता करातून सुट देण्याचे प्रावधान आहे आणि सभागृहाने ठराव क्र 72 च्या एप्रिल 2015 ला ठराव पारीत करुन ज्यांच्याकडे इकॉलॉजिकल सिस्टम मधील एक सर्व्हीस असेल तर त्यांना 5 परसेंट सामान्य करातून सुट दयावी तर एकापेक्षा जास्त असेल तर 10 परसेंट सुट दयावी असा ठराव पारीत केला होता ज्या मिळकतदारांनी घोषित केले आहे की आमच्या मिळकती मध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टीम लावलेली आहे त्याची तपासणी करुन घोषित केल्याप्रमाणे आपण त्या त्या लोकांना सामान्य करातून 5 टक्के सुट देत आहोत याची प्रसिध्दी करण्याकरिता आपण जे मिळकतदारांना जे मालमत्ता कराचे देयक वाटतो त्या देयकांमध्ये या बाबींची प्रसिध्द आपण त्या माध्यमातून देत आहोत जर आपण रेन वॉटर हार्वेस्टिंग कराल तर आपणाल 5 टक्के सुट त्याच्यापेक्षा जास्त कंपोस्ट, रिसायकलींग ऑफ वॉटर असेल तर एकापेक्षा जास्त असेल तर 10 टक्के सुट देण्यात येईल अशी आपण प्रसिध्दी नेहमी देतो आणि त्यानंतरही नागपूर शहरात जो सर्व्हे चालू आहे त्या माध्यमातून डाटा कलेक्ट करीत आहे की कुठल्या कुठल्या घरामध्ये सोलर सिस्टीम लागली आहे कुठल्या घरामध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टीम लागली आहे कंपोस्ट लागले आहे हा डाटा कलेक्ट करीत आहे त्या अनुषंगाने त्यांना सामान्य करातून सुट देण्याचा प्रयत्न करीत आहे.

श्री.प्रकाश भोयर :– मा.महापौरजी, सद्याची स्थिती अशी आहे की फक्त 5 टक्के आपण मालमत्ता करातून सुट देतो आहे रेन वॉटर हार्वेस्टींग करीता जर आपण पुर्ण नागपूर शहराचा विचार केला पाच ते साडेपाच लाख त्याच्यापेक्षा जास्त प्रॉपर्टी नागपूर शहरात आहे आपण ॲव्हरेज जर लोकांच्या घरांचा पकडत असाल तर साधारणतः 4000 हजार रुपये ॲव्हरेज नी पकडू तो 3000 ही होवू शकतो मग 3000 रुपयांचा टॅक्स जर झाला तर त्याला 5 टक्के सुट जर दिली तर फक्त 150 रु आपण सुट देतो 150 रु. सुटीच्या भरवश्यावर लोक रेन वॉटर हार्वेस्टींग करणार आहे काय?

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर, सामान्य कराच्या 5 टक्के म्हणजे 150 होत नाही ते 25 रु. पेक्षाही कमी होते.

महापौर :— सन्माननिय सदस्य टॅक्स मधुन सुट मिळविण्यासाठीच रेन वॉटर हार्वेस्टिंग करायचे आहे काय? याच्या मागचा हाच उद्येश आहे काय? फक्त टॅक्स मधुन सुट मिळविण्याकरिताच रेन वॉटर हार्वेस्टिंग करायचे आहे काय?

श्री प्रकाश भोयर :— मा.महापौर महोदया, नाही. आमचे म्हणणे असे आहे की रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टीम या शहराकरिता फार महत्वाची आहे या करिता की आपण वर्तमान पत्रामध्ये वाचले की पेंच मध्ये फक्त 12 टक्के पाण्याचा पुरवठा आहे मध्यप्रदेशमध्ये धरण झाले आहे त्यामुळे तेथे पाण्याचा साठा कमी आहे. आज जर नागपूर शहरात लोकांनी जर रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टीम केली नाही त्या पाण्यातून आपणच स्त्रोत निर्माण केले नाही तर भविष्यात येणारी परिस्थीती नागपूर शहरावर बिकट येणार आहे तर येथे 155 नगरसेवक बसले आहे त्यांना जरी विचारले तर.....

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौर महोदया, सन्माननिय सदस्य श्री.प्रकाश भोयर यांनी जो मुद्या उचलला त्या मुद्यांचे समर्थन करण्यासाठी मी येथे उभा आहे. त्यांच्याप्रमाणे ही जी 5 टक्के सुट आहे ती कमी आहे मला असे वाटते की सामान्य कराच्या 50 टक्के किंवा 75 टक्के सुट यामध्ये दिली पाहिजे. असे जर ते सुचवित असेल तर निश्चितच आम्ही त्यांचे समर्थन आम्ही निश्चितपणाने करु.

श्री.दयाशंकर तिवारी :— मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, मै आपसे निवेदन करुंगा की हमारे ए.डी. टी.पी. विभाग से इस बात पर निवेदन करने के लिये लगाए जिस समय हम नक्शा सांग्शन करके देते है उस समय रेन वॉटर हार्वेस्टींग की कंडीशन होती है या नही।

श्री.बंटी शेळके :— मा.महापौर महोदया, सर्वात पहिले आपण सभागृहातील सदस्यांना म्हणत आहे की आप आपल्या घरावर रेन वॉटर हार्वेस्टिंग केली पाहिजे, आयुक्त साहेबांच्या माध्यमातून मी प्रश्न विचारला होता की महानगरपालिकेच्या जुन्या इमारतीवर आणि नविन इमारतीवर आपण रेन वॉटर हार्वेस्टींग केले आहे काय?

श्री.दयाशंकर तिवारी :— मा.महापौर महोदया, पहिले मी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर येवू दया?

महापौर :— प्रशासनाने माहिती दयावी.

सहा.संचालक, नगररचना (श्रीमती थुल) :— मा.महापौर महोदया, दि. 28 ऑगस्ट 2009 आणि तदनंतरचे शुध्दीपत्रक आणि दि. 23 मार्च 2011 च्या शासन निर्णयान्वये 300 चौरस मिटर पेक्षा जास्तीचे जे काही भुखंड महानगरपालिका क्षेत्रातील आहे त्यांना रेन वॉटर सिस्टीम करणे हे बंधनकारक करण्यात आलेले आहे आणि तशी अट नकाशा मंजूर करतांना त्या पत्रकातही नमूद करतो.

श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी, ही जर अट आहे तर 300 स्केअर फुटच्या वरचे लोक जर हा नियम पाळत नसतील तर त्यांना पाण्याचे कनेक्शन दिले पाहिजे काय? या सर्व गोष्टी पण त्यामध्ये अंतर्भुत केले पाहिजे. नाहीतर नुसती अट ठेवुन काही होणार नाही. एक झाडांची अट आहे की 1500 स्केअर फुट प्लॉट असेल तर पुढे 3 झाडे लावायचे आहे किती लोकांनी झाडे लावले, मग ते डिपॉझिट किती वर्षापासुन आपल्याकडे पडून आहे. त्यामुळे नुसते अटी टाकून हे होण्यासारखे नाही आहे हा मुद्या बरोबर आहे की तुम्हाला रेन वॉटर हार्वेस्टिंग नुसते पैसे वाचवायला करायचे आहे काय? मुद्या असा आहे की आपल्याकडून जर तशी कारवाई झाली तर 300 स्केअर मिटरच्या वरती खरच किती बिल्डींग झाल्या त्यामुळे अशा इमारतीवर आपले डिपार्टमेंट आपला डेप्युटी इंजिनिअर, आपला जे.ई, आपले ए.डी.टी.पी. डिपार्टमेंट हे लक्ष घालते काय? 1500 स्केअर फुटावर 3 झाडे लावावयाचे आहे किती लोकांनी लावले त्यामुळे हा जो मुद्या आहे तो तपासण्याचा आहे. दयाशंकर तिवारीजींची काय, निशांत गांधीजींची काय? प्रफुल्ल गुडधेंची काय, प्रकाश भोयर यांची काय तीच मागणी आहे, नियम अटी, शर्ती सगळया आहे आता टॅक्सच्या मागे आपण त्यांचे इन्शुरन्स करतो अशी अट आहे हे किती लोकांना माहिती आहे त्यामुळे आपण या ज्या काही गोष्टी आहे त्या जनतेपर्यत कशा नेवू शकलो पाहिजे नुसते अटी आणि दंड यापेक्षा तुम्ही किती चांगले लोकांना शिक्षित करु शकता याच्यावर आधारभूत कार्यक्रम आहे.

श्री.निशांत गांधी :— मा.महापौर महोदया, यह राजकिय विषय नही है सामाजिक विषय है यह योजना के पिछे राजकिय हेतू नही था सामाजिक हेतु था। वरिष्ठ नगरसेवक दयाभैय्या ने सूझाव दिया है ओ.सी.डब्लु. को कनेक्शन देते वक्त रेन वॉटर हार्वेस्टिंग हो या ट्री प्लानटेशन हो वह कंम्पलसरी किया जाये बारीश के पहले इसका प्रपोगंडा करा करो इसके संदर्भ मे झोनमे जानकारी दि जायें।

महापौर :— सन्माननिय सदस्य, रेन वॉटर हार्वेस्टींगच्या संदर्भात प्रशासनाने ज्या अटीशर्ती टाकलेल्या

आहेत त्याची अंमलबजावणी बरोबर होत नाही. त्याच्यावर कटाक्षाने लक्ष ठेवण्याची गरज आहे जेणेकरून जनजागृती होवून याचा फायदा मनपाला मिळेल.

**प्रश्न क्र. 33** :— मौजा पारडी येथील कोण कोणते भुखंड डी.पी. प्लॅनमध्ये आहेत व हे भुखंड कोणत्या विकास कामाकरिता आरक्षित करण्यात आले आहे संदर्भात प्रश्न

श्री.पुरुषोत्तम हजारे :— मा.महापौर महोदया, जे मी प्रश्न विचारलेला होता त्यावर प्रशासनाने माहिती अधुरी दिली आहे माझी आपणांस विनंती आहे की पार्डी खसरा क्र 3.416 हेक्टर आर त्याच्या संदर्भात माहिती दयावी.

महापौर :— प्रशासनाने माहिती दयावी.

सहा.संचालक नगररचना (श्रीमती थुल) :— मा.महापौर महोदया, सन्माननिय सदस्य यांनी मौजा पार्डी येथे मार्केट करिता किती आरक्षणे विकास योजनेमध्ये दर्शविली आहे याची माहिती मागितलेली होती त्याच्या अनुषंगाने कार्यालयाने माहिती दिलेली आहे की मौजा पार्डी येथे विकास योजना अहवालानुसार आरक्षण क्र ई 23 अन्वये खसरा क्र 75 ची 3.416 हेक्टर आर जागा ही आरक्षित आहे म्हणुन मौजा पार्डी मध्ये केवळ हे एकमेव आरक्षण अहवालामध्ये दर्शविले आहे. मा.महापौर महोदया, ही जागा नागपूर सुधार प्रन्यासच्या मालकीची आहे परंतु येथे सद्या जागेवर अस्तित्वात मार्केट नाही आहे.

श्री.प्रदीप पोहाणे :— मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, जरी त्या जागेची मालकी एन.आय.टी. ची असली तरी आरक्षण हे मनपा चे आहे. मनपा चे आरक्षण असल्यामुळे तेथे आपल्याला बोर्ड लावता येते. मा. सदस्य श्री. पुरुषोत्तम हजारे यांनी जो विषय ठेवला आहे त्या संदर्भात सांगायचे झाल्यास आमच्या क्षेत्रामध्ये कुठेही आठवडी बाजार नाही आणि पार्डीच्या ओव्हरब्रिज चे काम सुरु आहे जर महानगरपालिकेचे आरक्षण आहे बाजाराचे तर तेथे बोर्ड लावावे आणि जे आठवडी बाजार करणारे लोक आहे आम्ही त्यांना आव्हान करु शकतो की तुम्ही तेथे बाजार लावू शकता याच्या मागची हीच एक भुमिका आहे.

श्री.पुरुषोत्तम हजारे :— मा.महापौरजी, पार्डी मध्ये सरस्वतीबाई तलमले यांच्या नावाची 5 हेक्टर 37 आर जागा आहे. आणि महानगरपालिका डी.पी. प्लॅन मध्ये आहे आणि त्या जागेवरती आपल्या महानगरपालिकेचे आरक्षण आहे. शाळासाठी आहे, दहणघाट साठी आहे, स्मशानभुमी साठी आहे आणि हॉस्पीटल साठी आहे. आपणांस विनंती आहे की ती जागा आता खूप वर्ष झाले आपल्या येथे नविन डि.पी. तयार करण्यात आला नाही. आणि आता ज्या वेळेस नविन डी.पी. तयार करण्यात येईल तेथे कमीत कमी 10 एकड जागा आपण बाजारासाठी आरक्षित कराल आणि पार्डी असो कि वर्धमान नगर असो या परिसरातल्या जनतेला न्याय मिळवून दयाल. कारण की महापौर साहेब आपण पाहात असेल वृत्तपत्रामध्ये वारंवार पार्डीचे अपघात हर आठवडयात व प्रत्येक दिवसात एक अपघात होतो. हा प्रश्न खुप गंभीर आहे कारण आमच्या पार्डी भागात जो आठवडी बाजार भरतो तो हायवे वर भरतो हे सर्वांच्या निर्देशनास आहे.

श्री.बाल्या बोरकर :— मा.महापौर महोदया, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, मा.सदस्य श्री पुरुषोत्तम हजारे यांनी जी तलमले यांची जागा सांगितली त्या जागेवर आरक्षण आहे त्यामुळे महानगरपालिकेला 127 च्या नोटीस दिली आहे ती मागच्या दोन वर्षापूर्वी दिलेल्या आहे.

श्री.पुरुषोत्तम हजारे :— पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन मा.महापौरजी, मी जेव्हा स्थायी समिती मध्ये सदस्य होतो तेव्हा दयाशंकर तिवारीजी अध्यक्ष होते अविनाश ठाकरे स्थायी समिती मध्ये होते त्यावेळेस अजेंडयावर ती जागा ॲक्वायर करण्यासाठी त्यावेळेस आपल्याकडे पैसे नव्हते म्हणून त्यांना टी.डी.आर. देवु शकलो नाही परंतू आपल्याकडे सिमेंट रोड बनविण्यासाठी पैसे आहे.

श्री.अविनाश ठाकरे :— पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन मा.महापौरजी, टी.डी.आर साठी कॉम्पनसेशन मागितले होते त्याची किंमत 110 करोडच्या वर होती मग आपण मा.कलेक्टर साहेबांकडे लॅन्ड ॲक्वॉयझेशन साठी पाठविलेले होते त्यानंतर महाराष्ट्र शासनाचा नियम आला की आपण आरक्षणाची मर्यादा अजून 10 वर्षा पर्यत वाढवितो आहे मग आपण 20 वर्षाकरिता ते आरक्षण आपण लोड करु शकतो.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, या ठिकाणी मा.सदस्य श्री.हजारें यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्यामध्ये डि.पी. प्लॅनमध्ये विविध आरक्षण आपण आरक्षित करुन ठेवतो मात्र त्याचे अधिग्रहन करीत नाही. आणि अधिग्रहन करीत नाही म्हणून लोक नागरी सुविधांपासुन लोक वंचित राहतात येथे पार्डी या भागातील समस्या या ठिकाणी सांगण्यात येत आहे की ओव्हर ब्रिजचे काम होत आहे. वाहतुकीची कोंडी होत आहे आणि

अशा परिस्थितीमध्ये तेथे आठवडी बाजार सुध्दा तेथे भरीत आहे. या ठिकाणी सहा.संचालक, नगररचना यांनी जे उत्तर दिले तेथे एन.आय.टी. ची जागा त्या ठिकाणी आरक्षित करण्यात आली आहे. आपण हा तात्पुरता बाजार त्या ठिकाणी स्थानांतरीत करु शकतो काय? किंवा ज्या ठिकाणी जागा अधिग्रहीत करायची आहे जसे सन्माननिय ठाकरे साहेबांनी सांगितले की, जमिनी अधिग्रहीत करतांना त्याचे रेडीरेकनर दर खूप अधिक झाले आहे. तर डि.पी. रिपोर्ट मध्ये त्यांची ॲक्वीझीशन कॉस्ट पण निश्चित केली असते. मा.महापौरजी, ज्या वेळेस डि.पी. प्लॅन तयार केला जातो त्यावेळेस त्याचा डि.पी. रिपोर्ट तयार होतो त्यामध्ये त्या जमिनीची ॲक्वीझीशन कॉस्ट पण निश्चित केली असते. तर ही कॉस्ट निश्चित झाली आहे मग त्याच्यासाठी जर आपण अधिग्रहणासाठी उशीर लावला म्हणून बाजार भावामध्ये दर वाढलेला आहे मा.महापौरजी, आता जी ॲक्वीझीशन कॉस्ट वाढली ती कुठुन उभी करतो आपण डिव्हलपमेंट कॉस्ट जो आपण वसुल करतो तो 2 रु आणि 4 रु चौरस फुटाच्या प्रमाणात तो डेव्हपमेंट फंड आपण वेगळया खात्यामध्ये जमा केला पाहिजे असा नियम असतांना मागील 17 वर्षापासुन अशा कुठल्याही प्रकारचा डेव्हलपमेंट फंड आपण स्वतंत्र खात्यामध्ये जमा न केल्यामुळे आज आपल्याला लॅण्ड ॲक्वीझीशन साठी पैशाची जी चणचण भासुन राहिली ती एकमेव कारणामुळे भासत आहे मा.महापौरजी, हा प्रश्न फक्त पार्डीचा नाही तर एखादे आरक्षण अधिग्रहनाच्या संदर्भातला नाही आणि आता 127 च्या नोटीसेस आल्या की महानगरपालिकेकडे पैसे राहत नाही. पैसे राहत नाही म्हणून ते आरक्षण सुध्दा व्यपगत होते.

श्री.अविनाश ठाकरे :— पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन मा.महापौरजी, आदरणिय प्रफुल्लजींने मांडलेल्या मुद्दा बरोबर मा.महापौरजी, या शहरामध्ये नियोजन प्राधीकरण जास्तीत जास्त वर्ष हे नागपूर सुधार प्रन्यास होते त्यामुळे डेव्हलपमेंट शुल्क नागपूर सुधार प्रन्यास कडे जास्तीत जास्त गेले आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन मा.महापौरजी, महानगरपालिका या शहराचे नियोजन प्राधीकरण 2001 मध्ये झालेले आहे. 2001 च्या आधी जे डेव्हलपमेंट शुल्क एन.आय.टी. ने वसुल केले.

श्री.प्रदीप पोहाणे :— पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन मा.महापौरजी, प्रश्न हा बाजाराचा आहे. आमचा प्रश्न असा आहे की जी बाजारासाठी आरक्षित जागा आहे तेथे बाजार लावू शकतो काय?

श्री.प्रफुल्ल गुडधे :— पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन मा.महापौरजी, सन्माननिय पोहाणे साहेबांनी जो प्रश्न उपस्थित केला तो प्रश्न त्याच्याशीच संबंधित आहे. कुठल्याही पध्दतीच्या आरक्षणाचा विरोध करीत नाही. ते आरक्षण अधिग्रहीत झाले पाहिजे नियोजन प्राधीकरणाच्या ताब्यात आले पाहिजे जेणेकरुन तेथे बाजार किंवा तत्सम सुविधा आपल्याला नागरिकांना देता येवु शकेल मात्र हे करीत असतांना जी चणचण आहे प्रशासकीय यंत्रणेला जी अडचण आहे पैशाची. जर 2001 नंतरचा जरी हिशोब महानगरपालिकेने ठेवलेला आहे काय ? हा माझा प्रश्न आहे. 2001 नंतरच्या डिव्हलपमेंट फंड मधुन किती निधी वसुल केलेला आहे आणि कोणत्या खात्यामध्ये ठेवला आहे याची माहिती प्रशासनाने दयावी.

श्री.प्रदीप पोहाणे :— मा.महापौरजी, याच प्रश्नामध्ये माझा प्रश्न आहे की मौजा पार्डीमध्ये येथील मनपा च्या जागेवर कमीत कमी आपले तेथे बोर्ड सुध्दा लागले पाहिजे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी पहिले माझ्या प्रश्नाचे उत्तर दयावे डेव्हलपमेंट फंड आपण स्वतंत्र खात्यामध्ये ठेवतो काय?

सहा.संचालक नगररचना (श्रीमती थुल) :— मा.महापौर महोदया, विकास शुल्क म्हणुन जो निधी घेतला जातो नगररचना विभागामार्फत याच्याकरिता सेपरेट अकाउंट करण्यात आले आहे त्या अकाउंट मध्येच तो निधी जमा होतो.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, तो कधी पासुन करण्यात आला आहे.

सहा.संचालक नगररचना (श्रीमती थुल) :— मा.महापौर महोदया, माझ्याकडे निश्चित माहिती नाही परंतु मी आल्यानंतर 2015 किंवा 2016 ला अकाउंट सेपरेट करण्यात आले आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, 2001 मध्ये डेव्हलपमेंट फंड आपण आपल्या क्षेत्रासाठी घेत आहोत आणि त्याचे किती पैसे जमा झालेले आहे त्याची पण माहिती देण्यात यावी. याच्या आधीचे पैसे आपण संपुर्ण डेव्हपमेंट फंड मध्ये वळते करणार आहोत काय जे वसुल केले आहे याची पण माहिती देण्यात यावी.

श्री.अविनाश ठाकरे :— मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर, प्रफुल्लजींने उपस्थित केलेला मुद्दा हा अत्यंत महत्वाचा आहे. याचे सर्व नियोजन नागपूर सुधार प्रन्यास कडे होते. जरी महानगरपालिकेकरिता जागा आरक्षित

होत्या तरी तो लेआउट प्लॅन मंजूरीचे अधिकार हे नागपूर सुधार प्रन्यास  कडे होते मग तो पैसा निश्चित त्यांच्या अकाउंट मध्ये जमा झालेला असेल मग नागपूर महानगरपालिकेने त्यांना पत्र पाठवून तो डेव्हलपमेंट एन.ए. महानगरपालिकेला मागितला तर निश्चितपणे हे लॅण्ड ॲक्वीझीशन होवु शकते.

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी, सन्माननिय ठाकरे साहेबांनी जो विषय उपस्थित केला त्याच अनुषंगाने माझे असे म्हणणे आहे की महानगरपालिकेला 2001 ते 2013 पर्यत जो विकास निधी वसुल केला त्याचा हिशोब करुन एका स्वतंत्र खात्यामध्ये तो पैसा वळता करण्यात यावा जेणेकरुन या सगळया आरक्षणा खालील जमिन आपल्याला अधिग्रहीत करता येवु शकेल, त्या संदर्भात मा.महापौरजी, आपण प्रशासनाला आदेश दयावे.

सहा.संचालक, नगररचना (श्रीमती थुल) :– मा.महापौर महोदया, जो काही निधी विकास शुल्क म्हणुन आमच्या कार्यालयाकडुन घेतला जातो त्यामध्ये 5 वेगवेगळे हेड आम्ही सेपरेट केले आहे त्यामध्ये वृक्ष संवर्धन वेगळा, त्यानंतर विकास शुल्क म्हणुन वेगळा, विकास शुल्कासाठी वेगळे खाते 2015 ला करण्यात आले आहे आणि त्याच्यानुसार पर्टीकुलर त्या अकाउंटमध्ये निधी जमा होतो.

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी, जो विकास शुल्क जमा झालेले आहे त्याचा हिशोब आपण करणार आहोत काय? कारण 2015 पासून 2020 पर्यत या डि.पी. चे महत्व आहे त्यानंतर आपल्याला पुन्हा रिवाईज डि. पी. तयार करावा लागेल आणि या दरम्यान आपण ॲक्वीझीशनच करणार नाही त्यामुळे 2001 च्या आराखडयाचे इम्पीमेंटेशन जवळ जवळ निग्लीजीबल राहणार आहे मा.महापौरजी, म्हणुन आता उरलेले आरक्षण महत्वाचे आरक्षण आहे. प्ले ग्राउंड असतील, बाजाराची जागा असतील, किंवा डी.पी. रोडस् असतील या सारखे महत्वाचे आरक्षण जर अधिग्रहीत करायचे असेल तर 127 अंतर्गत नोटीस आल्यावर सर्वच्या सर्व आरक्षण निधी अभावी व्यपगत होतील, त्यामुळे या निधीची तजवीज त्याची तरतुद आपण आता पासुनच करण्याची गरज आहे मा.महापौरजी आपण ते करण्याचे निर्देश स्पष्टपणे प्रशासनाला दयावे ही विनंती.

श्री.अविनाश ठाकरे :– मा.महापौरजी, या सोबतच माझे एक सजेशन आहे मध्यनंतरीच्या काळामध्ये नागपूर सुधार प्रन्यास तर्फे अनेक आरक्षण हे डि रिझर्व झाले आहे आता डि रिझर्व किती आरक्षण शिल्लक आहे आणि ते किती लेआउटला मंजूरी देता येईल याची ही माहिती घेवून तो निधी पण महानगरपालिकेकडे यावे या करिता प्रशासनाला निर्देश दयावे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी, डी.पी. च्या इप्लीमेंटेशन संदर्भात पुढच्या सभेमध्ये यावर सविस्तर चर्चा करण्यात यावी.

श्री.पुरुषोत्तम हजारे :– मा.महापौरजी, आपणांस माझी विनंती आहे की ज्या जागा आहे राखीव डि.पी. प्लॅनमध्ये त्या संदर्भात आपण प्रशासनाला निर्देश दयावे की तात्पुरता आठवडी बाजार भरविण्यासाठी कारण की आमचे विद्यार्थी असो, की आमचे भाऊबंद असो, आमचे आई असो आमचे वडील असो यांचे जीव जाणार नाही आणि आम्हाला आठवडी बाजार भरविण्यासाठी तेथे जागा उपलब्ध करुन दयावी.

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी, या मुद्या फार गाजत आहे की आपण डि.पी. चे इप्लीमेंटेशन नाही केले, आपण पैसे जमा केले नाही. मा.महापौरजी, यातली सर्वात मोठी भुमिका अशी आहे की आपल्याकडे जे नगररचना डिपार्टमेंट आहे याच्याकडे जे कामे असायला पाहिजे ते कामच नाही. त्या डिपार्टमेंट मध्ये ज्यांचे काम डि.पी. इप्लीमेंटेशनचे आहे त्यांना डी.पी. तयार करायचे आहे ते सर्व लोक फक्त प्लॅन कसा सॉग्शन करायचा त्यामुळे माझी विनंती आहे की इतर महानगरपालिकेत दोन सेपरेट डिपार्टमेंट आहे जेथे शासनाकडुन ए.डी.टी.पी किंवा डेप्युटी डायरेक्टर टाउन प्लॅनिंग येतो तो फक्त डि.पी. चे अधिग्रहन करतो त्याच्याकडे लेआउट मंजूर करण्याचे काम असते ही एकमेव अशी महानगरपालिका आहे की याच्याकडे एकाच माणसाकडे दोन्ही काम आहे त्यामुळे माझी आपल्या माध्यमातून मा.आयुक्तांना विनंती आहे मा.प्रफुल्लजींनी विनंती केली की या सभागृहात चर्चा झाली पाहिजे ती बिलकुल झालीच पाहिजे सोबतच या डिपार्टमेंटचे बायफरकेशन झाले पाहिजे. आपण नविन आकृतीबंधामध्ये केले आहे जेव्हा मुंबई मधुन मंजूर होईल तेव्हा आपण करुच परंतू सध्या आपल्या स्तरावर मा.आयुक्तांनी याचे दोन पार्ट केले पाहिजे सॉग्शनिंगचे पुर्ण काम जे कोणी तत्सम असतील त्यांच्याकडे देवुन आणि जे उरलेले काम आहे कारण आता स्मार्ट सिटी आहे, आता एन.आय.टी. चा ऐरिया आपल्याकडे येणार आहे त्यामुळे या डिपार्टमेंटला वेगळे काम आणि सॅग्शनिंगचे काम वेगळे डिपार्टमेंट हे जर केले तर त्याप्रमाणे प्रफुल्लजींने म्हटले, हजारे साहेबांनी म्हटले, पोहाणे साहेबांनी म्हटले हे सर्व कामे मा.ए.डी. टी.पी मॅडम च्या नेतृत्वात चांगले होतील आणि शहराचे आवश्यक जे अधिग्रहण आहे ते निश्चित होईल त्यामुळे

या प्रश्नाच्या संदर्भात हा ही विचार करण्यात यावा.

श्री.संजय बंगाले :– मा.महापौरजी, याच्यासोबतच एक सुचना आहे लॅण्ड ॲक्वीझीशनच्या संदर्भात विकास आराखडयामध्ये जेवढया जागा महानगरपालिकेच्या आहे त्या जागेवर कुठेही महानगरपालिकेचे बोर्ड लागलेले नाही, बाकी सर्व त्या त्या ॲथॉरिटीचे बोर्ड त्या त्या जागेवर असतात नागपूर सुधार प्रन्यासच्या अखत्यारित जेवढया जागा आहे त्या सर्व जागेवर नागपूर सुधार प्रन्यासचे बोर्ड आहे. पि.डब्लु.डी. च्या जागा असतील, सि.पी.डब्लु.डी. च्या जागा असतील त्याच्यानंतर पी.के.व्ही. च्या जागा असतील त्या सर्व जागेवर त्यांचे बोर्ड असतील आपले कुठेही बोर्ड नाही त्यामुळे ही सुचना इनक्लुड करावी, महानगरपालिकेने आपला मार्गदर्शक तक्ता तेथे लावावा आणि ज्या प्राईम लोकेशनच्या जागा आहे तेथे अतिक्रमण होतात एकदा का तेथे अतिक्रमण झाले 10–10, 15–15 वर्ष त्या जागेचे अतिक्रमण निघत नाही त्यामुळे आवश्यकता असेल तेथे कंपाउन्ड वॉल बांधण्यात यावी, आणि आपल्या जागा सुरक्षित ठेवाव्या.

महापौर :– मा.सदस्यांची भावना लक्षात घेवून मा.आयुक्तांनी याची पाहणी करून अहवाल सादर करावा व याबाबत धोरण ठरवावे.

**<u>प्रश्न क्र 34</u>** :– नागपूर महानगरपालिकेतील कर्मचारी व पदाधिकारी (सदस्य) यांचे करिता वैद्यकिय प्रतिपुर्ती देयक देण्याचे नियमानुसार प्रावधाना संदर्भात प्रश्न

निगम आयुक्तः– वितरीत केल्याप्रमाणे

**<u>प्रश्न क्र 35</u>** :– महानगरपालिकेच्या हद्दीतील तसेच नासुप्र अंतर्गत येत असलेल्या 572/1900 ले–आऊट मधील खाली प्लॉट असल्याने मोठया प्रमाणात कचरा संदर्भात प्रश्न

श्री विजय झलके :– मा.महापौरजी, या सभागृहात बसलेल्या सर्व मा.सदस्यांच्या जिव्हाळयाचा प्रश्न मी विचारलेला आहे. विशेषकरून जे नगरसेवक आउटर भागात राहतात त्यांच्या जास्तीत जास्त भाग एन.आय.टी. च्या अंतर्गत येतो त्या भागात जे ओपन प्लॉट आहे त्याचा आम्हाला मोठया प्रमाणात सामना करावा लागतो. लोक वारंवार तक्रारी घेवून येत असतात आणि त्या ओपन प्लॉटमध्ये पावसाळयाच्या दिवसामध्ये पाणी साचणे, तेथे कचरा जमा होणे व आज कालतर एक वेगळयाच प्रकारचे गवत पहायला मिळुन राहिले. यावर्षी ते मोठया प्रमाणात वाढुन राहिले आणि त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. प्रशासनाकडुन मला या संदर्भात विस्तृत माहिती पाहिजे आहे.

महापौर :– तुम्ही जे प्रश्न विचारले तुम्हाला याची माहिती यांनी दिलेली आहे.

श्री विजय झलके :– मा.महापौरजी, मला हे विचारावयाचे आहे कि नागपूर महानगरपालिकेच्या माध्यमातुन नागपूर सुधार प्रन्यास अंतर्गत येत असलेल्या भागात नागपूर सुधार कडुन आपण या सर्व प्लॉटधारकांची माहिती घेतली काय ? आपण त्या प्लॉटधारकांवर अश्याप्रकारच्या परिस्थितीमध्ये कोणती कार्यवाही करतो.

श्री संजय बंगाले :– पाईंट ऑफ इंफार्मेशन, मा.महापौरजी, मा.सदस्य, श्री झलके यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न याठिकाणी उपस्थित केला आहे. मागच्या अनेक वर्षापासून महानगरपालिका क्षेत्रामध्ये तो आउटर भाग असो कि इनर भाग असो, यांनी नागपूर सुधार प्रन्यासच्या अखत्यारीतला विषय घेतला, नागपूर शहराचा कंजस्टेड एरीया जो आहे या एरीयामध्ये मागच्या 20–25 वर्षापासून एक बाब प्रकर्षाने निदर्शनास येते, याठिकाणी मालक घर विकतो अग्रीमेंट टु सेल होते, आणि अग्रीमेंट टु सेल व सेलडीड याच्यामध्ये एक वर्षाचा कालावधी राहतो. अग्रीमेंट टु सेल झाल्यानंतर ज्याठिकाणी मालकाने ज्याला जागा विकली तो जागा हस्तांतरीत करतो. जागा हस्तांतरीत केल्यावर तो त्याचा ताबा घेतो आणि ताबा घेतल्यानंतर प्रशासनाकडे तो मॅप सॅग्शन करण्याकरिता तयारी करतो इनबिटवीन ती जुनी बिल्डींग तोडल्या जाते आणि त्या प्लॉट एरीयावर ज्यापध्दतीचा बांधकाम त्याला अनुज्ञेय आहे ते अनुज्ञेय बांधकाम करण्यासाठी तो आपली तयारी करतो आणि तयारी करीत असतांना तो जेव्हा कामाला सुरूवात करतो त्यावेळेस त्याठिकाणी अंडरग्राउंड कंस्ट्रक्शन असेल तो अंडरग्राउंड खोदण्याला सुरूवात करतो, याठिकाणी ज्यावेळेला बांधकाम तो सुरू करतो आणि बांधकाम सुरू केल्यानंतर त्याठिकाणची जी सिव्हर लाईन आहे त्याला न जोडता अंडरग्राउंडला जातो अंडरग्राउंडमध्ये बांधकाम सुरू करतो, बांधकाम सुरू करतांना पिल्लर सुरू होतात त्याचे अग्रीमेंट पुढचे काही होत नाही, अग्रीमेंट दोघांचे डिस्पुटमध्ये जाते, बिल्डींग डिस्पुटमध्ये जाते, आणि पावसाळयामध्ये गडरलाईनचा पाणी त्याच्यामध्ये जमा होते ते पाणी जमा झाल्यानंतर पाणी काढण्याची कुठलीही सोय होत नाही व

महानगरपालिका त्याकडे लक्ष देत नाही. महानगरपालिका दोघांना नोटीस पाठविते ओनर्सला पाठविते व ज्यांनी घेतला आहे त्याला नोटीस पाठविते. आणि त्यांच्याकडुन दंड वसुल करण्याचा प्रयत्न करते परंतु त्या स्थितीत होते काय कि आजूबाजूला राहणा–या लोकांना त्रास होते या अनुषंगाने सभागृहात विषय ठेवण्यांत आला आहे त्याचा सविस्तर उत्तर आपण द्यावे.

आरोग्याधिकारी :– मा.महापौरजी, नागपूर शहरात ओपन प्लॉटची संख्या आपल्या टॅक्स विभागाप्रमाणे 22890 आहे. त्यापैकी विभागाला आढळुन आलेली एकुण प्लॉटवर कचरा असलेल्या प्लॉटची संख्या 2613 आहे आणि 2613 पैकी 416 प्लॉटचा कचरा साफ करण्यांत आलेला आहे. ज्या प्लॉटवर झोननिहाय कचरा आढळला अश्या प्लॉटची संख्या 2613 आहे.

श्री मनोज सांगोळे :– मा.महापौरजी, टॉवर्सच्या संदर्भात हायकोर्टामध्ये प्रकरण सुरू आहे. आणि हायकोर्टाच्या न्यायाधिशांनी नवीन गाईड लाईन्स दिलेल्या आहेत कि, कुठलीही वसाहत निर्माण होते वेळेस त्यांनी गडर लाईन, वॉटर लाईन, रस्ते आणि बिजली याची सोय झाल्यानंतरच त्यांना नळाचे कनेक्शन द्यावे.

श्रीमती आभा पांडे :– पाईंट ऑफ इंफार्मेशन, मा.महापौरजी, मागच्या रेझीममध्ये मी जेव्हा त्या वेळेसचे मा.महापौर, आदरणीय सोले साहेब जेव्हा महापौर होते त्यावेळेस मी हा प्रश्न सभागृहात उचलला होता आणि तेव्हा आम्हाला सगळयांना कळले होते कि जेव्हा पासुन नागपूर महानगरपालिका अस्तित्वात आली तेव्हापासून या बाबतीतले एकही नियम नागपूर महानगरपालिकेत बनलेले नाहीत. या विषयावर सभागृहात चर्चा झाल्यानंतर मा.महापौरजी यांनी आदेश दिले होते कि या विषयाच्या संदर्भात उपविधी तयार करावी आणि जेव्हा माझे छोटे बंधु श्री प्रविण दटके महापौर होते. त्यावेळेस ती उपविधी मंजूर करण्याकरिता सभागृहात आली, ती उपविधी मंजूर होवुन सरकारकडे गेलेली आहे. मा.महापौरजी, मी तुम्हाला निवेदन करू इच्छिते कि सगळे नगरसेवक याबाबतीत खूप संतप्त झाले आहे, जेव्हा नागरिक आमच्या घरी येतात कि ओपन प्लॉटवरून कचरा उचलण्याची जबाबदारी कोणाची आहे, आमच्याकडे उत्तर राहत नाही. त्याही वेळेस जेव्हा मी प्रश्न विचारला होता त्यावेळी आयुक्तांचे निर्देश होते कि, जोपर्यंत उपविधी मंजूर होवून सरकारकडुन येथे येत नाही तोपर्यंत ओपन प्लॉटला स्वच्छ करण्याची जबाबदारी ही नागपूर महानगरपालिकेची राहणार आहे. परंतु याकडे एकही अधिका–यांचे लक्ष राहत नाही, म्हणुन आपणांस निवेदन करू इच्छिते कि तुमची सत्ता आहे तेथे कोणाला तरी विमानाने पाठवुन लवकरात लवकर ती उपविधी येथे आणावी आणि ते नियम सगळे लागु करायचे जेणेकरून सगळयांना त्याचा लाभ होईल.

श्रीमती कांता रारोकर :– मा.महापौरजी, हा पुर्ण नागपूर शहराचा विषय आहे, मी ज्या प्रभागामध्ये राहते त्या प्रभागाचा एव्हरेज रेशु काढला तर तेथे दोन घरानंतर एक ओपन प्लॉट असते. जेव्हा त्यांच्यावर कार्यवाही करण्यासाठी आम्ही सांगतो तेव्हा आम्हाला सांगण्यात येते कि तुम्ही ओपन प्लॉटवाल्यांचे पत्ते काढा तेव्हा आम्ही त्यांना नोटीस देवु. आम्ही त्या ओपन प्लॉटवाल्याला फोन करून सांगतो कि भाऊ तुझ्या प्लॉटवर कचरा आहे बाजुवाल्याला त्रास होतो तु साफ कर. माझी अशी अपेक्षा आहे कि आपण ग्राउंड रेंट वाढवावे नाही तर आपण हेल्थच्या माध्यमातुन त्याचे काम करून घेत आहे. आपण रिकाम्या प्लॉटधारकांकडुन शुल्क आकारावे यामुळे त्यांचेही काम सोपे होईल व आपलेही काम सोपे होईल.

श्री मनोज सांगोळे :– मा.महापौरजी, रिकाम्या प्लॉटमुळे डुकरे जास्त झाले आणि त्या पिरीअडमध्ये मा. ज्येष्ठ नगरसेवक श्री संदिपजी सहारे माझ्याकडे आले होते व खाली प्लॉटवरून डुकरे पळत होती त्यावेळेस मा.नगरसेवक पडले ही शोकांतिका आहे एक ज्येष्ठ नगरसेवक पडु शकते तर बाकी सामान्य नागरिकांचे काय ?

महापौर :– मा.सदस्यगण, ओपन प्लॉटवर जमा होणा–या कच–याचा विषय अत्यंत गंभीर आहे. शासनाकडे या अनुषंगाने मंजूरी मागण्यात आली आहे. या बाबींकडे प्रशासनाचे दुर्लक्ष झाले आहे. या विषयावर प्रशासनातर्फे लवकरात लवकर पाठपुरावा करून मार्ग काढावा. मी स्वःत या विषयात लक्ष घालणार आहे.

<u>प्रश्न क.36</u> :– नागपूर महानगरपालिकेत आरोग्य अधिकारी या पदावर आवश्यक शैक्षणिक पात्रता काय आहे? सदंर्भात प्रश्न

श्री मोहम्मद जमाल :– मा.महापौरजी, मैंने जो प्रश्न प्रस्तुत किया था उस प्रश्न का जो मुझे उत्तर मिला है वह उत्तर देखने के बाद मुझे ऐसा लगता है कि, यह उत्तर घुमाफिराकर दिया गया उत्तर है

इसलिये मैं चाहुंगा कि संबंधित अधिकारी सही तरीके से मुझे इस प्रश्न का उत्तर दे। नागपूर महानगरपालिकेत आरोग्य अधिकारी या पदाची शैक्षणिक पात्रता काय आहे. आरोग्याधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्याबाबत जानकारी दी जाये।

सहा.आयुक्त (साप्रवि) :– मा.महापौरजी, मा.सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे त्या प्रश्नाचा उत्तर आपण दिले आहे त्या व्यतिरिक्त मी पूरक माहिती सांगतो. म.न.पा. ठराव 233 सन 1999 मध्ये एक ठराव केला होता. त्यानुसार आपल्याकडे आरोग्याधिका–यांची दोन पदे आहेत. आरोग्याधिकारी, स्वच्छता व आरोग्याधिकारी, वैद्यकीय आपल्याकडे सध्या आरोग्याधिकारी, वैद्यकीय या पदावर डॉ.चिव्हाणे कार्यरत आहे. ते एम.बी.बी.एस.एम. डी. आहे व दुसरा जे पद आरोग्याधिकारी, स्वच्छता होते त्या पदावर डॉ.गणवीर कार्यरत होते. मात्र जून 2016 मध्ये ते अर्जित रजेवर गेले असतांना तात्पूरत्या स्वरूपात डॉ.दासरवार यांना अतिरिक्त कार्यभार देण्यांत आला होता. तदनंतर डॉ.गणवीर हे वैद्यकीय कारणामुळे महानगरपालिकेत रूजु न झाल्यामुळे डॉ.दासरवार यांच्याकडे सध्या आरोग्याधिकारी स्वच्छताचा चार्ज आहे.

श्री मोहम्मद जमाल :– मा.महापौरजी, यह जो तात्पूरता चार्ज दिया गया है डॉ.दासरवारजी को तो क्या इसका कोई ठराव इस सदन मे मंजूर किया गया था क्या ?

सहा.आयुक्त (साप्रवि) :– मा.महापौरजी, फक्त तात्पूरत्या स्वरूपाचा चार्ज देण्यांत आला याच्यात पदोन्नती किंवा नियुक्ती न केल्यामुळे मा.आयुक्तांच्या अधिकारांतर्गत 69 मध्ये जे अधिकार आहे मा.आयुक्तांना त्या अधिकारांतर्गत फक्त तात्पूरत्या स्वरूपाचा चार्ज देण्यांत आला तो परमानंट चार्ज नाही. मा.सदस्यने जो प्रश्न क्या था कि अगर जाहिरात करनी है तो उसकी शैक्षणिक पात्रता क्या है, अगर आरोग्याधिकारी या पद पदोन्नती से अगर भरना है तो उसके लिये एम.बी.बी.एस. प्लस ज्येष्ठता व योग्यता प्लस रोस्टर जो रहता है उसके हिसाब से पदोन्नती दी जाती है।

श्री जुल्फेखार अहमद भुटटो :– मा.महापौरजी, हम जो तात्पूरता यह शब्द इस्तेमाल करते है इसकी कोई समय सीमा है क्या ?

सहा.आयुक्त (साप्रवि) :– मा.महापौरजी, इसकी कोई समय सीमा नही है। मैंने जैसाकि बताया कि डॉ. गणवीर छुटटीपर गये थे, इसलिये डॉ.दासरवार को चार्ज दिया गया था शुरूवात मे वह अर्जित रजे पर गये थे, ऐसा एक्स्पेक्टेड नही था कि वह नही आ पायेगें उसके बाद उनकी वैद्यकीय रजा होने के कारण वह आ नही पाये।

श्री जुल्फेखार अहमद भुटटो :– मा.महापौरजी, इस बात को कितने साल हो गये। तात्पूरता की जो परिभाषा है उसकी समयसीमा डिसाईड होना चाहिये।

सहा.आयुक्त (साप्रवि) :– मा.महापौरजी, 1 जून 2016 से 24 जून 2016 तक उन्होने अर्जित रजा ली थी, उसके बाद मे वह वैद्यकीय कारणो से वह उपस्थित नही हो पाये थे। वह वैद्यकीय कारणोसे अभी तक अनुपस्थित रहे।

श्री मोहम्मद जमाल :– मा.महापौरजी, यह जो तात्पूरता अधिकार दिया जाता है अभी जुल्फेखार भाईने भी यह विषय सामने लाया। यह अधिकार कितने दिन के लिये सीमित होना चाहिये। मुझे उत्तर दिया गया था कि ज्येष्ठता और योग्यता, ज्येष्ठता यांनी सिनिअरीटी होगया और योग्यता का आधार क्या है महानगरपालिका मे अगर हम इस पद को जाहिरात व्दारा भरते है तो इसके लिये जो योग्यता मांगी गयी है एम.बी.बी.एस. एम.डी. लगती है। और तात्पूरता जो दासरवारजी को इस पद पर नियुक्त किया गया है, उनकी योग्यता क्या है उनसे योग्य अधिकारी नागपूर महानगरपालिका मे नही थे क्या ? क्योंकि आजकी तारीख मे जो नागपूर महानगरपालिका का हाल है पिछली बार 20 वे नंबरपर नागपूर शहर स्मार्ट सिटी के लिये चुना गया था और आजकी तारीख मे 137 वे नंबरपर नागपूर महानगरपालिका का नंबर आता है। कही न कही यह स्वच्छता का अभाव है हमारे नागपूर शहर मे जिसकी वजह से हम 20 वे नंबर से 137 वे नंबर पर चले गये है। मैं यह जानना चाहता हुं कि क्या नागपूर महानगरपालिका मे स्वच्छता अधिकरी इनसे योग्य दुसरा व्यक्ति नही था क्या ? या फिर नागपूर महानगरपालिका ने जाहिरात बुलाकर दुसरा स्वच्छता अधिकारी क्यों नही नियुक्त किया।

श्री मनोज सांगोळे :– मा.महापौरजी, माझे मित्र जमालजी एक गोष्ट सांगतो कि जे सध्या कार्यरत असलेले आरोग्याधिकारी सफाई ते ऑलरेडी म्हणतात कि मला हे पद पाहिजे नाही. मला घरी बसविण्यांत

यावा असे पत्र त्यांनी दिलेले आहे. मा.महापौरजी, मी तुम्हाला विनंती करतो कि, हे जेव्हापर्यंत सेवानिवृत्त होत नाही, तेव्हापर्यंत त्यांना ठेवण्यांत यावा किंवा त्यांच्यापेक्षा कुठली दुसरी व्यक्ति ज्येष्ठ असेल तर त्यांना बसविण्यांत यावा, मी अशी आपणांस श्री जमाल साहेबांकडूनच विनंती करतो.

महापौर :– आरोग्याधिका–यांची जागा प्रशासनाने त्वरीत भरावी आणि आरोग्य विभागाला न्याय द्यावा.

श्री मोहम्मद जमाल :– मा.महापौरजी, मेरे प्रश्न का एक हिस्सा बचा हुआ है। नागपूर शहर मे विविध ठिकाणो पर सडक निर्माण का काम, उडडान पुल का काम, मॅट्रो रेल्वे का काम शुरू है वहां पर जो हमारे सफाई कामगार काम करते है वहां पर आजकी तारीख मे किसी भी प्रकार का सफाई का काम नही हो रहा है। मुझे जो यह उत्तर दिया गया है वह पुरा गलत दिया गया है कि एक साईड का काम शुरू होने के कारण वह सफाई कर्मचारी दुसरे साईड पर काम करता है, जबकि वास्तविकता आप खुद जाकर देख सकते है जिस साईड का काम शुरू है उसके दुसरे साईड से यातायात शुरू है, उस रोड के हालात ऐसे है कि वहां कोई झाडु चलती नही है क्योंकि वहां पॉसीबल नही है झाडु चलाना, इसलिये यह जो कर्मचारी है इन कर्मचारीयो का पिछले एक साल से क्या हुआ यह कर्मचारी कहां काम कर रहे है। इनका पगार कहां से निकल रहा है या फिर इनको कहां शिफ्ट किया गया है इस बात की पुरी जानकारी मुझे इस सदन मे दी जाये।

आरोग्याधिकारी :– मा.महापौरजी, आपल्या नागपूर शहरात एकुण 66 जागी सिमेंट रोडचे काम सुरू आहे. ब–याच वेळेस रस्त्यांचे काम अर्धवट राहतात, त्याच प्रभागात जे रिक्त बीट राहतात त्याठिकाणी त्यांचे काम चालु आहे.

श्री मोहम्मद जमाल :– मा.महापौरजी, जो जानकारी मुझे यहां दी गयी है वही जानकारी यहां पर फिरसे दासरवार साहब ने फिर से दी है। मैं आपका ध्यान आकर्षित करना चाहुंगा कि, उस परिसर मे आप देखसकते है कि वहां पर सफाई का कौनसा कर्मचारी काम कर रहा है। मेरे प्रभाग के अंदर गणगौर बिअर बार से लेकर चारखंबा तक रोड का काम चालु है, वहां कौनसा कर्मचारी रोड की सफाई कर रहा हैं या फिर पारडी परिसर मे उडडान पुल का काम चालु है, वहां पर कौनसा कर्मचारी सफाई का काम कर रहा है या फिर कलमना मार्केटवाला जो उडडान पुल का काम चालु है, वहां पर कौनसा कर्मचारी सफाई का काम कर रहा है यह टोटल जानकारी गलत तरीके से दी गयी है। मैं जानना चाहता हुँ कि यह कर्मचारी कहां गये क्योंकि जो घोळ चल रहा है खास तौरसे आरोग्य विभाग मे यह घोळ इतना खतरना घोळ है कि यहां पर कई कर्मचारी बिना काम किये अपनी हाजरी लगा रहे है। और इसके बारे मे कई बार दासरवारजी को बताने के बाद भी इसपर कोई कारवाई नही की गयी। मैं अपने प्रभाग से संबंधित बात कर रहा हुॅ तो मेरे प्रभाग मे सफाई कर्मचारीयो का अभाव है। मेरे प्रभाग के काम पुरे तरीके से हो नही रहे है जो काम बताया जाता है उसको करने मे दो दो दिन लग जाते है। मेरे प्रभाग के अंदर जो अतिरिक्त कर्मचारी बचे हुऐ है यह कर्मचारी कहां है मैं कई बार झोनल अधिकारी से पुछ चुका हुॅ। उन्होने मुझे इस बात का कोई उत्तर नही दिया है इसलिये मुझे उत्तर दिजीये कि यह कर्मचारी कहां है।

आरोग्याधिकारी :– मा.महापौरजी, एकुण दहा झोनमध्ये जे काही रस्त्यांचे काम सुरू आहे. ते कर्मचारी झोनकडुन आलेल्या माहिती प्रमाणे एक तर ज्याठिकाणी अर्धवट रोड सुरू आहे त्याठिकाणी काम करीत आहे, किंवा बाजूच्या बीटवर काम करीत आहे.

श्री मोहम्मद जमाल :– मा.महापौरजी, मैंने जो रास्ते बताये है उन रास्तो की आप चौकशी किजीये उसके डिटेल्स लिजीये आपको सब बाते समझमे आ जायेगी।

श्रीमती परिणिता फुके :– मा.महापौरजी, पाईट ऑफ इंफार्मेशन, आता जे अधिका–यांचा प्रश्न मा. सदस्यांनी ठेवलेला आहे मला हे विचारावयाचे आहे अतिरिक्त चार्ज जो दिल्या जातो, त्या चार्जचा टाईमिंग किती असतो. ज्या अधिका–यांना जो चार्ज दिला जातो त्याचा टाईमिंग किती असतो. ज्या अधिका–यांचा टाईमिंग संपल्यावर ते आपला चार्ज कुठल्या किंवा कोणत्या अधिका–याला देऊन जातात जे मोठे दवाखाने असतात त्यांचा चार्ज कोण घेतो.

आरोग्याधिकारी:– मा.महापौरजी,जो चार्ज दिल्या जातो तो आपले काम सांभाळुन अतिरिक्त चार्ज दिल्या जातो.

महापौर :– मा.सदस्या आपला विषय हॉस्पिटलशी रिलेटेड आहे यांचा जो विषय आहे तो स्वच्छतेशी संबंधित आहे. तुम्हाला हॉस्पिटलबद्यल प्रश्न विचारावयाचा आहे तो नंतर द्या.

श्री मोहम्मद जमाल :– मा.महापौरजी, यह सफाई कर्मचारीयो का विषय है यह सफाई कर्मचारी कहां गये इनकी हाजरी लग रही है या नही इसकी पुरी तरीके से जांच की जाये जो संबंधित अधिकारी इसमे जबाबदार है उसपर कारवाई की जाये। आप ऐसे आदेश यहां पर दे।

महापौर :– आरोग्य अधिका–याची जागा प्रशासनाने त्वरित भरावी व आरोग्य विभागाला न्याय द्यावा. मा.सदस्य श्री.जमाल यांनी सफाई कर्मचा–यांचा बाबतीत जो प्रश्न उचलला तो अत्यंत गंभीर स्वरूपाचा आहे. याची चौकशी करून 15 दिवसांत अहवाल सादर करण्यात यावा.

**प्रश्न क. 37** :– सफाई कामगारां संदर्भात प्रश्न

श्री जितेंद्र घोडेस्वार :– मा.महापौरजी, मेरा प्रश्न था कि, नागपूर शहर के अंदर मे बढती हुई लोकसंख्या के अनुपात सफाई मजदुरो की संख्या बहोत कम है। मेरे प्रश्न का जो उत्तर मुझे मिला है वह समाधानकारक नही मिला। इसलिये मैं इस प्रश्न के प्रति प्रशासन के माध्यम से जानकारी चाहता हुँ।

महापौर :– मा.सदस्य, श्री जितेंद्रजी घोडेस्वार आपला मुख्य प्रश्न काय आहे व आपल्याला कशाचे उत्तर पाहिजे.

श्री जितेंद्र घोडेस्वार :– मा.महापौरजी, माझा प्रश्न असा आहे कि नागपूर महानगरपालिकेत सफाई कामगारांची भरती केव्हापासून बंद आहे.

महापौर :– त्याचे उत्तर तुम्हाला दिलेले आहे.

श्री जितेंद्र घोडेस्वार :– मा.महापौरजी, दिलेले उत्तर समाधानकारक नाही, त्याचे कारण असे कि, नागपूर शहरामध्ये लोकसंख्येचा पाप्युलेशन किती आहे. आणि नागपूर शहराचा भुगोल कसा आहे. नागपूर शहरामध्ये पाप्युलेशन किती आहे वर्तमान स्थितीत कर्मचारी किती आहे. अस्थायी व स्थायी कर्मचारी किती आहे आणि आकृतीबंद पध्दतीने किती कर्मचा–यांची मागणी केली. प्रशासनानी 2016 नंतर शासनाशी काय पाठपुरावा केला.

महापौर :– प्रशासनानी माहिती द्यावी.

आरोग्याधिकारी :– मा.महापौरजी, आपल्या नागपूर महानगरपालिकेत स्थायी कर्मचा–यांची संख्या आहे 3890 मंजूर पदे आहे त्यापैकी 3596 कार्यरत आहे. आणि पद भरती लाड पागे समितीव्दारे आपली नियमितपध्दतीने होवुन राहिली आहे. आणि त्याचप्रमाणे ऐवजदारांची संख्या 4353 आहे.

श्री जितेंद्र घोडेस्वार :– नागपूर शहराचे पाप्युलेशन किती आहे. ते सांगु शकता काय ? स्वच्छतेच्या संदर्भात प्रश्न सभागृहात विचारला जाते वर्तमानपत्रातुन प्रश्न विचारले जातात आणि अस्वच्छता शहरामध्ये निर्माण होत आहे. नागपूर शहराचे पाप्युलेशन सध्या किती आहे.

आरोग्याधिकारी :– मा.महापौरजी, नागपूर शहराची लोकसंख्या 27 लाखाच्या जवळपास आहे.

श्री जितेंद्र घोडेस्वार :– मा.महापौरजी, नागपूर शहराची संख्या 27 लाखाच्या वर आहे म्हणजे ही जी तुम्ही कर्मचा–यांची स्थायी व अस्थायी संख्या सांगीतलेली आहे, ती पुरेशी आहे काय ? त्या आकृतीबंधामध्ये 3596 व 4353 गुंतले तर 8560 होतात. मग हया 8560 मध्ये 27 लाखाच्यावर जी पाप्युलेशन नागपूर शहरामध्ये आहे, ती स्वच्छता करण्याकरिता पुरेशी आहे काय ? आणि तुम्ही याचे झोनवाईज वर्गीकरण सारख्याप्रमाणात केलेला आहे काय ?

आरोग्याधिकारी :– मा.महापौरजी, सध्या जी रचना झालेली आहे ती जुन्या प्रभाग पध्दतीने बीटनुसार झालेली आहे.

श्री जितेंद्र घोडेस्वार :– मा.महापौरजी, मला हा प्रश्न विचारावयाचा आहे कि लक्ष्मीनगर झोन, धरमपेठ व गांधीबागची लोकसंख्या किती आहे. आणि आसीनगर झोनची लोकसंख्या किती आहे जर आपण या सफाई कर्मचा–यांच्या वर्गीकरणाचा जर आराखडा तयार करतो आणि त्यानुसार नागपूर शहर स्वच्छ बनविण्याकरिता प्रशासनाच्या माध्यमातुन 10 ही झोनमध्ये कर्मचा–यांचे वर्गीकरण करीत असतो त्या संदर्भामध्ये आपण तो योग्य असा वर्गीकरण केलेला आहे काय ?

आरोग्याधिकारी :– सध्याच्या परिस्थितीत जी जूनी प्रभाग रचना होती आणि बीट पाडलेले होते त्याप्रमाणे कर्मचा–यांची नेमणुक करण्यांत आलेली आहे.

श्री जितेंद्र घोडेस्वार :– मा.महापौरजी, बीटच्या संदर्भात जी माहिती देण्यांत आली आहे, जुने जे बीट आहे त्या संदर्भात तुम्ही कर्मचा–यांची रचना करतात, नागपूर शहराचा भुगोल हा उतरता आहे, उत्तर नागपूर

आणि आसीनगर झोन हे सगळया शहराच्या खालच्या दिशेने आहे. शहरातील सर्व मलमुत्र व पाणी हे उत्तर नागपूरच्या दिशेने वळत असते आणि त्यामुळे तेथे किती ही वेळा रस्ते बनविले, नाल्या बनविल्या, गडर लाईन बनविले तरी शहराचा संपुर्ण सांडपाणी व उत्तर नागपूरच्या आसीनगर झोनमधुन वाहत असतो. आणि जो बर्डीवरून जो नाला चालतो त्याला प्रशिक्षित लोक कॅनल म्हणतात, आणि उत्तर नागपूरमध्ये जो नाला वाहतो त्याला विकृतपध्दतीने चांभार नाला असे म्हटल्या जाते, या सभागृहामध्ये याची नोंद घेण्यात यावी म्हणजे उत्तर नागपूरच्या विकासाच्या संदर्भात सभागृहात प्रश्न विचारला जात असेल तर या तिन्ही झोनमध्ये लोकसंख्येचा प्रमाण पाहिला तर याच्यामध्ये वर्गीकरणाची संख्या जास्त आहे. हे वर्गीकरण उत्तर नागपूरच्या कर्मचा–यांच्या दुपटटीने आहे. आता स्वच्छता अभियान संपुर्ण भारतामध्ये चाललेला आहे, आणि 22 वा आंकडा नागपूर शहराचा स्वच्छतेच्या संदर्भात एकेकाळी होता, तो आज 136 वर गेलेला आहे आणि त्यामुळे हे जे कर्मचा–यांचे वर्गीकरण करण्यांत आलेले आहे.

श्री सुनिल अग्रवाल :– मा.महापौरजी, पाईंट ऑफ इंफार्मेशन, मा.महापौरजी, मा.सदस्य, श्री घोडेस्वारजी ने यहां पर प्रश्न उठाया कि, तीन झोनो मे वहां की जनसंख्या के हिसाब से सफाई मजदुरो की संख्या ज्यादा है। तो मैं प्रशासन से जानना चाहुंगा कि हम जनसंख्या के हिसाब से काम बांटते कि वहां के एरीया के हिसाब से काम बांटते है।

आरोग्याधिकारी :– मा.महापौरजी, एरीया के हिसाब से काम बांटते है जैसे बीट रहते है उस हिसाब से काम बांटते है।

श्री सुनिल अग्रवाल :– मा.महापौरजी, इसलिये मेरा कहना है कि, यह जो प्रश्न मा.सदस्यो ने यहां पर उपस्थित किया है कि जनसंख्या ज्यादा है और वहां सफाई मजदुर कम है यह गलत है।

श्री जितेंद्र घोडेस्वार :– मा.महापौरजी, सरासरी ऐसा अनुमान है प्रशासन का 27 लक्ष की लोकसंख्या ली गयी है। एक लक्ष के पिछे सफाई मजदुर 250 के आंकडे मे महानगरपालिका का अनुमान है और महानगरपालिका का एक लक्ष लोकसंख्या के अनुपात मे 250 कर्मचारी सफाई मजदुर होना चाहिये, तो यह अनुमान के आधार पर उसकी भरती प्रक्रिया की जाती है क्या ? वास्तविकता मे नागपूर शहर की लोकसंख्या यह बढती जा रही है और बढती हुई लोकसंख्या के अनुपात मे आकृतीबंद पध्दती के हिसाब से जो ठराव लिया गया आज भी वह पुरेसा नही है और अभी भी इन्होने जो बताया कि, 8500 कर्मचारीयो की हमने जो मागणी की है उसके हिसाब से स्थायी कर्मचारी और अस्थायी कर्मचारीयो की संख्या अगर पकडे तो 4732 होती है। इसतरह आकृतीबंद पध्दतीसे 1070 कर्मचारीयो की संख्या नागपूर शहर मे 27 लाख पाप्युलेशन के लिये चाहये। आकृतीबंद के माध्यम से यह भरी कब जानेवाली है।

श्री मनोज सांगोळे :– मा.महापौरजी, माझे मित्र श्री घोडेस्वारजी यांचे एकच म्हणणे आहे, या शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे व आपला कर्मचारी वर्ग हा अपूरा पडत आहे. आणि काही कर्मचारी मरण पावले आहे ती संख्या कमी होत आहे. त्यामुळे सफाईवर जास्तीत जास्त कर्मचारी डेप्युट करावे, नवीन भरती करावी, ही त्यांची न्यायोचित मागणी आहे आणि सर्वच नगरसेवकांची मागणी आहे सभागृहात असा कुठलाही एक नगरसेवक असे म्हणणार नाही, कि माझे प्रभागात सफाई कर्मचारी पुरेपर आहे.

श्री बाल्या बोरकर :– मा.महापौरजी, पाईंट ऑफ इंफार्मेशन, माझे प्रभागात 220 कर्मचारी आहे प्रभाग 23 नांव नोंद करून घ्या. आणि 220 कर्मचा–यांची हजेरी घेतल्या जाते, तेव्हा हजेरी स्टॅन्डवर 100 लोक हजर असतात, परंतु 220 कर्मचा–यांची हजेरी लागली राहते आणि कर्मचारी जेव्हा वार्डात पाहिल्या जाते तेव्हा कर्मचारी आढळुन येत नाही. स्वतः मी फिरलो मी कर्मचा–यांचे नांव नोंदविले तेव्हा माझे लक्षात आले कि 70 कर्मचा–यांची हजेरी लागली. आणि 27 कर्मचारी हजर होते. मी दासरवार व आमच्या लकडगंज झोनच्या सहा. आयुक्तांना वारंवार सांगीतले आहे कि चोराला हाकला व चांगला अधिकारी आमहाला द्या. त्या 220 लोकांचा पगार कसा निघते हा माझा प्रश्न आहे.

महापौरः–मा.सदस्यगण,आपण आज जी हेल्थ विभागावर चर्चा केली ती उत्कृष्ट चर्चा झालेली आहे, आपण या आधीच्या ही प्रश्नावर या विभागावर चांगली चर्चा केलेली आहे. मा.आयुक्तांनी हेल्थ विभागावर विशेष लक्ष द्यावे. मा.सदस्य, प्रफुल्लजी गुडधे यांचा जो गणवेषाचा प्रश्न आहे त्याच्यावर निवेदन मा.आयुक्तांनी करावे.

निगम आयुक्त :— मा.महापौरजी, शालेय गणवेष वाटपच्या अनुषंगाने मागच्या वेळेस मा.सदस्य, श्री प्रफुल्ल गुडधे यांनी प्रश्न उपस्थित केला होता त्याबाबतीत मी निवेदन करीत आहे. शैक्षणिक सत्र 2016—17 पर्यंत महानगरपालिकेच्या शाळेमध्ये जे विद्यार्थी आहेत त्यांना गणवेष वाटप थेट पध्दतीने त्यांना पैसे देवुन करीत होतो. याच्यामध्ये इयत्ता एक ते आठ करिता सर्वशिक्षा अभियानांतर्गत जे पात्र विद्यार्थी आहे त्यांच्यासाठी तसेच सर्व मुलींच्यासाठी आपण गणवेष देत होतो. त्याच्यानंतर एस.सी. एस.टी. व बी.पी.एल.च्या मुलांना आपण गणवेष देत होतो. आणि इयत्ता 9 ते 12 चे जे पात्र विद्यार्थी आहे त्यांना म.न.पा.चा ठराव क्रमांक 71 आहे त्याप्रमाणे आपण यांना याच्यामध्ये समाविष्ट केले होते. शासन निर्णय दिनांक 5—12—2016 अन्वये जी काही व्यक्तिक लाभची योजना आहे ती सर्व योजना थेट लाभ हस्तांतरण या पध्दतीने लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये डायरेक्ट जमा केले पाहिजे. आणि असे करतांना आधार नंबरशी ते लिंक केले पाहिजे. यादृष्टीने शासनाच्या सूचना प्राप्त झाल्या त्याच्यानंतर दि.18—3—2017 रोजी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषद यांनी शालेय गणवेष वाटप योजनावर देखील डी.बी.टी.प्रणालीने हे वाटप करण्यांत यावे अश्यापध्दतीचे आदेश निर्मित केले. मार्च 2017 मध्ये अश्यापध्दतीचे आदेश आल्यानंतर शिक्षण विभागामार्फत सर्व मुख्याधिकारी आणि शिक्षण विभागाचे सर्व संबंधितांना आवश्यक दिशानिर्देश या अनुषंगाने निर्गमित करण्यांत आले. त्याच्यानंतर दिनांक 29—04—2017 रोजी 16—5—2017 रोजी व 23—5—2017 रोजी बैठक व कार्यशाळा घेवून सर्व मुख्याध्यापकांना आणि इतर संबंधितांना मार्गदर्शन करून ती कार्यपध्दती कश्यापध्दतीची राहिल यादृष्टीकोणातुन सांगण्यात आले. परंतु या सर्व प्रक्रिया राबवित असतांना याच्या अंमलबजावणीमध्ये काही अडचणी निर्माण झाल्या या संपुर्ण प्रक्रियेला पालकांचा व मुलांचा अत्यंत अल्पप्रतिसाद मिळाला त्याची कारणमिमांसा जेव्हा करण्यांत आली तेव्हा प्रमुख कारण समोर आले ते असे होते कि राष्ट्रीय बॅंकाकडुन बॅंक खाते उघडण्याच्या बाबतीत जे सहकार्य आपल्याला मिळावयास पाहिजे होते ते सहकार्य मिळाले नाही. त्याच्यानंतर आधार कार्ड तयार करण्याची जी प्रक्रिया होती ती मध्यंतरी स्लो झाली होती. यामुळे विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढता आले नाही, त्याच्यानंतर विद्यार्थी व पालक यांच्याकडुन प्रथम पैसे देवुन गणवेष खरेदीला जी आर्थिक तरतुद करावी लागते त्यासाठी योग्य असा प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे जी गणवेष वाटपाची प्रक्रिया होती त्याचा अल्प इम्प्लीमेंटेशन होवु शकले. या परिस्थितीवर मात करण्यासाठी व शासन निर्णयाप्रमाणे दिशा सुनिश्चित करण्यासाठी मा.महापौर महोदयांच्या अध्यक्षतेखाली चर्चा करण्यांत आली, बैठक घेण्यांत आली, त्याचप्रमाणे महानगरपालिकेच्या बैठकामध्ये वेळोवेळी चर्चेच्या माध्यमातुन बैठकांच्या माध्यमातुन जे काही मुद्दे उपस्थित करण्यांत आले त्यामध्ये देण्यांत आलेले निष्कर्श दिशानिर्देशच्या अनुषंगाने व इतर ही म.न.पा.मध्ये याप्रमाणे कश्यापध्दतीने कार्यवाही केली जात आहे यादृष्टीने माहिती घेण्यांत आली महाराष्ट्रातील काही महानगरपालिकेनी डायरेक्ट बॅनेफिट ट्रांन्स्फर पध्दतीच्या माध्यमातुन बॅनेफिट ट्रांन्स्फर योजना अवलंबलेली आहे त्याच्यामध्ये पुणे महानगरपालिकेनी ही डीबीडी कार्डची योजना अवलंबलेली होती. पुणेच्या आयुक्तांशी याबाबतीत चर्चा करण्यांत आली व कशी प्रक्रिया त्यांनी राबविलेली आहे त्याच्या बाबतीत माहिती मागविण्यांत आली. यापध्दतीचे जे डीबीडी कार्ड आहे त्याच्यामध्ये शालेय गणवेष व इतर साहित्यासाठी देखील ही पध्दत आपल्याला वापरता येते आणि हे शासन निर्णय जे आले आहे त्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने आपल्याला काही प्राब्लेम त्याच्यामध्ये येणार नाही. शालेय गणवेष व इतर साहित्य जे आपण देतो त्याच्यासाठी वेगळा अकाउंट काढण्यांत आला या अकाउंट अंतर्गत प्रत्येक पात्र लाभार्थ्याला डी.बी.डी कार्डची तरतूद करण्यांत आली. विद्यार्थ्यांना दोन गणवेष प्राप्त झाल्यानंतर त्याची पावती जी आहे ते दिल्यानंतर डी.बी.डी. कार्डच्या माध्यमातुन रक्कम त्यांच्या खात्यामध्ये जमा करण्यांत येणार आहे. पुरवठादारांना गणवेष उपलब्ध करून देण्याच्या बाबतीत आव्हान त्याठिकाणी करण्यांत आले. ही संपुर्ण प्रक्रिया राबविण्याचे एक सकारात्मक परिणाम आपल्याला दिसुन आले आणि ऑगष्ट अखेर 21,553 जे आपले विद्यार्थी आहेत त्यापैकी 100 टक्के मुलांना एक एक जोडी गणवेष मिळालेला आहे व सध्यास्थितीमध्ये 70 टक्के पात्र मुलांना दुसरे जोडी गणवेष देखील प्राप्त झालेला आहे. 30 सप्टेंबरपर्यंत ही पुर्ण प्रक्रिया पुर्ण केली जाणे अपेक्षित आहे. हा जो विद्याधन डी.बी.डी. कार्ड आहे याचा उपयोग इतरही जे साहित्य आपण मुलांना वितरीत करीत आहे त्याच्यासाठी याचा उपयोग पुढे करण्याची योजना आहे.

श्री तानाजी वनवे :— मा.महापौरजी, मा.सदस्य, श्री संदिप सहारेजीं चा एक विषय आहे जसा हा

अहवाल आहे तसा त्यांच्या विषयाच्या संदर्भातील अहवाल वाचुन दाखविला तर त्यांचा समाधान होईल.

श्री संदिप सहारे :— मा.महापौरजी, मला अहवाल मिळालेला आहे, त्याच्यामध्ये कोणाची स्वाक्षरी नव्हती आणि अहवालाचा वाचन या सभागृहामध्ये होणे गरजेचे होते. मला एक कागद दिला मी कसा समजणार कि तो अहवाल आहे कि नाही.

श्री संदिप जोशी :— मा.महापौरजी, माझ्या माहितीप्रमाणे अहवाल दिल्यानंतर तो अहवाल त्या दिवसापासून कायम होतो. याच्याबद्यलची काय खरी स्थिती आहे ती प्रशासनानी सांगावी.

सहा.आयुक्त (साप्रवि) :— मा.महापौरजी, मा.सदस्यांनी जे प्रश्न उपस्थित केले होते त्या संदर्भात लेखी अहवाल मागच्यावेळेस समिती विभागाकडे सादर केला होता आणि त्यानंतर मा.सदस्यांना सुध्दा तो अहवाल देण्यांत आला होता.

श्री संदिप जोशी :— मा.महापौरजी, त्याच्यावरती स्वाक्षरी नाही असे त्यांचे म्हणणे आहे मला असे वाटते कि स्वाक्षरी करून तो अहवाल त्यांना ताबडतोब देण्यांत यावा.

श्री संदिप सहारे :— मा.महापौरजी, जसा या अहवालाचे वाचन सभागृहात झाले तसेच त्या अहवालाचे वाचन सुध्दा सभागृहात झाले पाहिजे. त्याला काय अर्थ राहणार आहे हा सभागृहाचा प्रश्न आहे. आणि सभागृहामध्ये कळायला पाहिजे कि त्या अहवालावर काय झाला.

श्री संदिप सहारे :— मा.महापौरजी, माझ्या माहिती प्रमाणे तो काही अहवाल नव्हता तो प्रफुल्लजीच्या विषयावर लक्षवेधीवरती निवेदन होते. तो काही अहवाल नव्हता, मला जी माहिती आहे कि अहवाल एकदा दिल्यानंतर त्याचे वाचन सभागृहात होते असे मला वाटत नाही. एकदा ते बघुन घ्या त्यांना जो अहवाल दिलेला आहे त्याच्यामध्ये काही चुका असतील व काही दुरूस्ती असतील तर प्रशासनाला उजागर करावे त्याच्यामध्ये नियमित करून घेता येईल.

<u>ठराव क्रमांक 94</u>:— महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक 25.01.1999 व म.न.पा. ठराव क्र. 22 दिनांक 30.08.2000 अन्वये नागपूर महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान प्राप्त करुन विहीत प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य केले होते. त्याकरिता महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक 05.05.2007 अन्वये दिनांक 31.12.2007 पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आली होती. ज्यांची दिनांक 31.12.2007 ते जन्मदिनांकानुसार वयाची 50 वर्षे पूर्ण झाली त्या दिनाकांपर्यंत देण्यात आलेल्या वेतनवाढीच्या अतिप्रदानाची रक्कम वसुल करण्याच्या अटीवर MS-CIT परिक्षा उत्तीर्ण होण्यापासुन सूट देऊन पदोन्नती देण्यात आली आहे. किंवा दिनांक 31.12.2007 पर्यंत परिक्षा उत्तीर्ण न केल्यामुळे वेतनवाढी थांबविण्यात आली आहे किंवा परिक्षा उत्तीर्ण होईपर्यंत दिलेल्या वेतनवाढीमुळे अतिप्रदानाची रक्कम वसुल करणेचे अटीवर पदोन्नती देण्यात आली आहे. तथापि अशा सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या अतिप्रदानाची रक्कम वसुलीच्या आदेशास परिपत्रक क्र. साप्रवि/18/परि, दिनांक 27.07.2017 अन्वये तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे. महानगरपालिकेतील वर्ग 3 व त्यावरील अधिकारी/कर्मचाऱ्यांनी 31 डिसेंबर, 2017 चे आत MS-CIT प्रमाणपत्र सादर करणेसाठी मुदतवाढ तसेच यानंतरही प्रमाणपत्र सादर न करणाऱ्या सर्व अधिकारी/कर्मचारी यांना शासन निर्णयानुसार असलेल्या अटी व शर्ती अन्वये रकमेची वसुली करणेबाबतचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 95</u>:— बांगलादेश नाईक तलाव परिसरातील गैरउपयोगी व अनावश्यक ठरलेले अंतिम संस्कार भवन पाडण्यास मंजुरी देण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 96</u>:— नागपूर महानगरपालिकेच्या मौजा—नारी खसरा क्र. 64/1 व 2 या जागेवरील मॅटर्निटी होमकरिता आरक्षण वगळून या क्षेत्रातील बहुउद्देशिय संस्थेने मा. मुख्यमंत्री व मा. पालकमंत्री यांना उद्देशुन पत्र दिले असून पुढील कारवाई करीता नागपूर सुधार प्रन्यास, ने दि. 26.06.2017 ला ससंनर/रचना/6822 नुसार विकास योजना नागपूर उक्त जागा शासनाने दि. 27.02.2002 च्या अधिसुचनेनुसार नियोजन प्राधिकरण म्हणून नागपूर महानगरपालिका कार्यक्षेत्रात समाविष्ट असल्याचे पत्र श्री. डी.टी. रंगारी, अध्यक्ष, विश्रामनगर नागरीक

संस्था, रा. प्लॉट नं. 90 यांच्या नावाने दिलेले आहे. फेरबदलाचे अधिकार नागपूर महानगरपालिकेला असल्यामुळे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना 1066 चे कलम 37 अन्वये फेरबदल करुन खेळाचे मैदान व उद्यान यासाठी नागरीकांच्या मागणीनुसार करण्यात यावे. उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस." सभागृहाने विचारात घेतला

श्री. मनोज सांगोळेः– मा.महापौरजी, विश्राम नगर नागरीक समिती द्वारा तेथील नागरिकांची अशी विनंती आहे. मेटरनिटी होमची आरक्षण असलेली जागा त्या मेटरनिटी होमचा युझर चेंज करून बगीचे, खेळाचे मैदान म्हणून करण्यात यावे अशी विनंती केलेली आहे आणि परस्पर मा.मुख्यमंत्री साहेब, मा.पालकमंत्री साहेब आणि एनआयटी सोबत पत्रव्यवहार केलेला आहे. त्याचा अहवाल आलेला आहे. माझी विनंती आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनियम प्रादेशिक नगररचना विभाग 10/66 चे कलम 37 नुसार कार्यवाही करण्याचे आदेश करावे अशी मी विनंती करतो.

श्री.सुनिल अग्रवालः– मा.महापौरजी, पाईंट ऑफ इर्न्फोमेशन, मनोज भाई का प्रश्न आया है, ठीक है मगर उन्होने डयु प्रोसीजर ऑफ लॉ फॉलो किया है क्या? मा.सीएम को लिख रहे है, मा. पालकमंत्री को लिख रहे है, लेकीन जो संबंधित विभाग है, उनको जो भी पुरे कागजात है, उसे देखते हुए उसकी उन्होने मागणी की है क्या?

श्री. मनोज सांगोळेः– मा.महापौरजी, त्यांनी केलेला पत्रव्यवहारात आणि त्याचा मिळालेला जवाब यापूर्वी नगररचना विभागाला गेलेला आहे.

श्री.सुनिल अग्रवालः– मा.महापौरजी,जैसे की आपने प्रश्न मे कहां है की एनआयटी द्वारा यह बताया गया है की इसकी जो प्राधिकारीणी है वह एनएमसी है । तो एनएमसी के पुर्ण डयु प्रोसीजर ऑफ फॉलो किया क्या?

श्री. मनोज सांगोळेः– मा.महापौरजी, त्यांनी केलेल्या पुर्ण पत्रव्यवहाराचा प्रश्न सभागृहात यायच्या आधी सर्वचे सर्व दस्तावेज मा. नगररचनाकार यांच्याकडे दिलेले आहे. त्यानंतर पुर्ण प्रकरण पटलावर ठेवलेले आहे.

श्री.सुनिल अग्रवालः– मा.महापौरजी, मुझे जो जानकारी है, डायरेक्ट पार्टी ने अप्रोच करना चाहिए एनएमसी को। प्रशासनने इसकी जानकारी देना चाहिए ।

महापौरः– प्रशासनाने माहिती दयावी.

श्रीमती थुल(सहा.संचालक, नगररचना):–मा.महापौर महोदया, या अनुषंगाने प्रतिलिपी म्हणून एनआयटीकडून दि. 26.06.2017 ला पत्र प्राप्त झाले आहे. त्या अनुषंगाने आम्ही यापूर्वी देखील एनआयटीला विचारणा केली होती की, मुळात ही जागा कुणाच्या मालकीची आहे. या जागेचे कागदपत्र, नकाशा, ओनरशिपचे डाक्युमेंट देण्यात यावे म्हणून आज हा विषय आलेला आहे.

श्री.संदीप जोशीः– मा.महापौरजी, आपण पत्र पाठविले तर उत्तर आले आहे काय?

श्रीमती थुल(सहा.संचालक, नगररचना):–मा.महापौर महोदया, नासुप्र कडून उत्तर आलेले नाही.परंतु हा विषय होता म्हणून आम्ही ही माहिती कलेक्ट केली.

श्री.संदीप जोशीः– मा.महापौरजी, डयु प्रोसिजर मध्ये हा संपुर्ण प्रस्ताव त्या भागातील नागरिकांची इच्छा आहे त्यानुसार पुढच्या वेळेस परत आणावा. जो काही पत्रव्यवहार, डाक्युमेंट असतील त्यानुसार नगररचना विभागाला तसे आदेश दयावे.

श्रीमती नेहा निकोसेः– मा. महापौरजी, हा प्रस्ताव एनआयटीला गेलेला आहे. मी त्याच एरियात राहते. तेथील जागा आरक्षित केली आहे. तेथील लोकांनी मागणी केली आहे की येथे उद्यान करण्यात यावे परंतु खसरा क्र. 64/1 व 2 च्या बाजूला आणखी एक मैदान आहे. ऑलरेडी तेथे वॉकींग ट्रॅक झालेला आहे. वॉकींग ट्रॅकवर सव्वा दोनशे लोक वॉक करायला येतात तेथे एनआयटीने झुले सुध्दा लावलेले आहे मला वाटते हा प्रस्ताव स्थगित ठेवावा. मॅटरनिटी होमची पडीत जागा आहे. बाजूला जागा आहे आमदार निधीतून गार्डन झाले आहे हे मला माहीत नाही. गार्डन झालेले आहे ती जमीन आरक्षित आहे. ती शाळेसाठी आरक्षित आहे. येथे पैसे वेस्ट न करता मंजूरी दयावी ही माझी विनंती आहे.

श्री.मनोज सांगाळेः– मा.महापौरजी, या विषयाला पुन्हा मागणी करतो आणि माहिती देतो. ऑलरेडी मा.

सदस्या श्रीमती निकोसे यांनी याच जागेवर बगीचा बनविण्यात यावा म्हणून प्रस्ताव तयार केलेला आहे. त्याच्या वरती मा.सभापती यांनी 32 लक्ष रू.चे प्रावधान दिलेले आहे. हे सर्व करते वेळेस त्याचे युझर चेंज करणे गरजेचे आहे. मिळालेला निधी हा रद्द होवू शकतो ही सर्व चौकशी करूनच पुढील प्रस्ताव सादर करण्याची विनंती करतो.

वरील चर्चेनंतर नागपूर महानगरपालिकेच्या मौजा–नारी खसरा क्र. 64/1 व 2 या जागेवरील मॅटर्निटी होमकरिता आरक्षण वगळून या क्षेत्रातील बहुउद्देशिय संस्थेने मा. मुख्यमंत्री व मा. पालकमंत्री यांना उद्देशुन पत्र दिले असून पुढील कारवाई करीता नागपूर सुधार प्रन्यास, ने दि. 26.06.2017 ला ससंनर/रचना/6822 नुसार विकास योजना नागपूर उक्त जागा शासनाने दि. 27.02.2002 च्या अधिसुचनेनुसार नियोजन प्राधिकरण म्हणून नागपूर महानगरपालिका कार्यक्षेत्रात समाविष्ट असल्याचे पत्र श्री. डी.टी. रंगारी, अध्यक्ष, विश्रामनगर नागरीक संस्था, रा. प्लॉट नं. 90 यांच्या नावाने दिलेले आहे. फेरबदलाचे अधिकार नागपूर महानगरपालिकेला असल्यामुळे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना 1066 चे कलम 37 अन्वये फेरबदल करुन खेळाचे मैदान व उद्यान यासाठी नागरीकांच्या मागणीनुसार करण्यात यावे. उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस." सभागृहाने विचारात घेवून हया जागेचा बदल करण्यासंदर्भात तपासणी करून आणि माहिती घेवून रितसर प्रस्ताव सादर करण्यात यावा या मा. महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने मान्यता प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 97</u>:– : – नागपूर शहरात नोंदणीकृत खाजगी दवाखान्यांच्या नुतनीकरण करीत असतांना (काही दवाखान्याच्या Bed संख्येत वाढ करीत असतांना) जे निकष आहेत हयावर सविस्तर चर्चा करण्याकरिता व योग्य निर्णयाकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेतला

श्रीमती आभा पांडेः– मा.महापौरजी, मैने एक जानकारी डिपार्टमेंटसे मांगी थी । मेरा दिनांक 08.09.17 का पत्र था । उसमे मुझे प्रशासनने जो जानकारी दी, मैने उसमे पुछा था की सन 2015 मध्ये दवाखान्यात किती खाटांची वाढ करून देण्यात आली व त्याचा संपुर्ण तक्ता ज्यामध्ये दवाखाने त्याच्या नावासह आधीच्या खाटांची संख्या किती त्याचा संपुर्ण तक्ता देण्यात यावा. परंतु मा.महापौरजी सन 2015–16 मधील अनुज्ञेय खाटांचा तक्तासह सन 2017–18 च्या अद्यावत खाटांची यादी संलग्न करण्यात आली आहे. ही यादी जी मी मागितली होती. ती माहिती मला प्रशासनाने कां दिली नाही याचे उत्तर मला प्रशासनाने दयावे.

महापौरः– प्रशासनाने माहिती दयावी.

डॉ.चिव्हाणेः– मा.महापौरजी, संगणीकीकरण 2012 नंतर नागपूर शहरामधील 1430 क्लिनिक, 650 इंडोर हॉस्पीटल होते. या अगोदरचा जो संच आहे तो एकत्रित करण्यासाठी वेळ लागणार होता. त्याबद्दल मा. सदस्यांशी माझे सुध्दा बोलणे झालेले होते जी वेळ दिलेली होती ती दोन तासाची होती माझ्या माहितीप्रमाणे.

श्रीमती आभा पांडेः– मा.महापौरजी, पाईंट ऑफ इन्फोमेशन, मी काल सुध्दा चिव्हाने साहेबांना फोन केला होता की माझी माहिती तुम्ही तयार केली आहे काय? मी सिव्हिल मध्ये आली आहे. मी तुम्हांला फोन केला होता किंवा नाही.?

डॉ.चिव्हाणेः– मा.महापौरजी, काल सकाळी 10.30 पासून नागपूर शहरामध्ये मा. आरोग्यमंत्री बैठक घेत होते मला त्याठिकाणी हजर राहावे लागणार होते.

श्रीमती आभा पांडेः– मा.महापौरजी, आता कसे म्हणत आहेत हे. मी कालपर्यंतच नाही मी रोजच फोन करीत होते. माझी माहिती तयार केली काय? मग दोन तास कशासाठी सांगत आहे. त्यादिवशी पासून मी किती वेळा फोन केला आहे हे मा.महापौरजी मॅडम ला सांगा. तुम्ही काय लपवित आहे ते खरं खरं सांगा. सभागृहाची दिशाभूल करू नका.

डॉ.चिव्हाणेः– मा.महापौरजी, विभागाला लपविण्यासारखे काही नाही. 629 जे काही रूग्णालय आहेत त्याची यादी मी दिलेली आहे.

श्रीमती आभा पांडेः— मा.महापौरजी, पाईंट ऑफ इन्फोमेशन, शहरात एकुण 630 आंतर रूग्णालय आहेत यातून एक दवाखाना कां कमी केला याचे पहिले उत्तर दयावे.

डॉ.चिव्हाणेः— मा.महापौरजी, विस्तृत माहिती घेवून कळवितो.

महापौरः— चिव्हाणेसाहेब 629 आहेत की 330 रूग्णालय आहेत.

डॉ.चिव्हाणेः— मा.महापौरजी, परवाच्या दिवशीच त्यांना 329 रूग्णालयाची लिस्ट दिलेली आहे.

श्रीमती आभा पांडेः— मा.महापौरजी, दि. 7.09.17 ला विभागाकडूनमार्फत माहिती देण्यात आली त्याच्यामध्ये शहरात किती खाजगी दवाखाने नोंदणीकृत आहे असा प्रश्न विचारला असता प्रशासनातर्फे मला लिहून दिले त्यात नागपूर शहरात एकुण 630 रूग्णालय नोंदणीकृत नर्सिंग होत आहेत. मग एक दवाखाना कोणता कमी केला याचे मला उत्तर दयावे. आता त्यांनी 629 असा शब्दाचा प्रयोग केला आहे. एक दवाखाना कशासाठी तुम्ही कमी केला आहे.

डॉ.चिव्हाणेः— मा.महापौरजी, याबद्दल विस्तृत पाहून सांगतो.

श्रीमती आभा पांडेः— मा.महापौरजी, माहिती विस्तृत कां पाहायची आहे. ही माहिती तुम्हीच दिली आहे. 630ची यादी दिली आहे आणि सांगतांना 629 यादी दिली म्हणून सांगत आहे.तर एक हॉस्पीटल जे कमी केले ते कोणते हॉस्पीटल कमी केले आहे. सांगा चिव्हाणे साहेब दोन तासाची वेळ नाही दिली आहे भरपूर वेळ आहे. मी नोटीस लावलेली आहे.

डॉ.चिव्हाणेः— मा.महापौरजी, मी माफी मागतो जी यादी तुम्हाला दिली आहे 631 ची लिस्ट आहे. 630 नंबरचे हॉस्पीटल आहे हे वेदांश हॉस्पीटल आहे आणि 631 हॉस्पीटल आहे ते दलाल नर्सिंग होम,नंदनवन नागपूर आहे.

श्रीमती आभा पांडेः— मा.महापौरजी, आता 631 झाले. मग दोन दिवसाआधी मला माहिती देतांना 630 आणि येथे बोलतांना 629 आणि आता सांगता 631 हे काय आहे मा.महापौरजी.

डॉ.चिव्हाणेः— मा.महापौरजी, त्यातून एक लिस्ट सुटलेली आहे असे मला वाटते.

श्रीमती आभा पांडेः— मा.महापौरजी,पाईंट ऑफ आर्डर, मला जी यादी यांनी दिली तीच यादी यांच्याकडे आहे. जेव्हा एखादा नगरसेवक नोटीस लावतो तेव्हा जी नगरसेवकला माहिती दिली आहे त्याची फाईल बनवून आणतात. तुम्ही फाईल काढा त्यात 630 नोंदणीकृत हॉस्पीटल असतीलच. तुम्ही चुक केली आहे की मला चुकीची माहिती दिली आहे की तुम्ही चुकीचे बोलत आहे.

, डॉ.चिव्हाणेः— मा.महापौरजी, चुकीचा भाग त्यात नसावा असे मला वाटते. मिसप्रीन्ट आहे. देतांना चुक झाली आहे. एक पेज मध्ये दोन नावे आली आहेत. ती चुक माझ्या विभागाकडून, कर्मचा—यांकडून झालेली आहे.

श्रीमती आभा पांडेः— मा.महापौरजी, दुसरा पेज लावण्याकरिता यांना मनाई केली होती काय? की जास्तीचा पेजेसचा वापर करू नका. आपण पहिले क्लिअर करावे 629 नोंदणीकृत हॉस्पीटल खरे आहेत की 630 आहेत की 631 आहेत. तुम्ही चुकले की तुम्ही मला चुकीची माहिती दिली दोन प्रश्न विचारले याचे उत्तर मला देवून टाकावे.

, डॉ.चिव्हाणेः— मा.महापौरजी, माझ्याकडे लिस्ट आहे मी त्वरित मा.सदस्यांना देतो.मी अगोदरच माफी मागितली आहे. हे देतांना शेवटचे पान राहिलेले आहे. त्वरित देतो.

श्रीमती आभा पांडेः— मा.महापौरजी, यांनी दोन तासाचे जे सांगितले ते चुकीचे सांगितले 630, 631 वर जे अडकले तेही यांनी चुकीचे सांगितले याच्यावर त्यांनी माफी मागितली आहे. मला हे म्हणावयाचे आहे की शहरात 630 नोंदणीकृत हॉस्पीटल झालेले आहे याच्या व्यतिरिक्त जे बोगस डॉक्टरांनी जे दवाखाने महानगरपालिकेच्या हद्दीत उघडलेले आहे त्याची नोंदणी झालेली नाही म्हणूनच ते बोगस असे धरावे असा नियम आहे. त्यानुसार आपल्या महानगरपालिकेच्या टीमने कधी असा सर्वे केला आहे काय? जेथे बोगस डॉक्टर यांना सापडले आहे ते केव्हा केव्हा केले आहे.

महापौरः— प्रशासनाने माहिती द्यावी.

डॉ.चिव्हाणेः— मा.महापौरजी, बोगस डॉक्टरांच्या बाबतीत आरोग्य विभागातर्फे एक टीम कार्यरत आहे. जेव्हापासून बोगस डॉक्टरांची पाहणी करीत आहे शहरात बोगस डॉक्टर सुध्दा आढळलेले आहे. त्यामध्ये तीन डॉक्टरांवर एफआयआर दाखल केलेले आहे.

श्रीमती आभा पांडेः— मा.महापौरजी, ती जी टीम आहे त्या टीममध्ये किती लोक आहेत जे प्रत्येक क्षेत्रात जातात. 27 लक्षाचे आपले शहर आहे. 27 लक्षाचे शहरामध्ये फक्त 630 नोंदणीकृत हॉस्पीटल आहेत. अजून डिस्पेंसरी वगैरे असतीलच तर तुमची टीम केव्हा केव्हा, कुठे कुठे जाते या बाबतचा काही तक्ता आहे काय? काही प्लॉनिंग आहे काय?

डॉ.चिव्हाणेः— मा.महापौरजी, जरूर आहे. तक्ता पण आहे आणि जेव्हा जेव्हा इन्स्पेक्शन जातो त्याचा रिपोर्टही सुध्दा आहे. या विषयाशी संबंधित नसल्यामुळे तो माझ्याकडे नाही आहे. आपल्याला उपलब्ध करून देता येईल.

श्रीमती आभा पांडेः— मा.महापौरजी, जेव्हा ही आम्ही माहिती विचारतो यांच्याकडे एकही माहिती राहत नाही. जेव्हा सभागृहात एखादा प्रश्न एखादया नगरसेवकांनी लावला तर यांनी संपुर्ण माहितीसह हजर राहण्याचे हे यांचे कर्तव्य आहे. नाही तर सगळी माहिती मी तर घेवूनच आली आहे. पंधरा दिवसापासून मी हाऊसची तयारी करते. आणखी काही पुरक प्रश्न असू शकतात याची तयारी करून यावयास पाहिजे याची सगळया अधिका—यांनी नोंद घ्यावी मा. महापौरजी. नुतनीकरण दवाखान्याचे करीत असतांना जे निकष पाळल्या जातात ते मला सांगितले मुंबई सुश्रुषा गृहनिर्माण अधिनियम 1949 अंतर्गत कलम 5 व 2 अधिन राहून ज्या दिनांकापासून नुतनीकरण पत्र देण्यात आले त्या दिनांकाच्या लगत पासून 31 मार्च पर्यंत दर तीन वर्षात त्यांना नुतनीकरण करावयाचे आहे हे सत्य आहे. जे तुम्ही सुश्रुषा गृहनिर्माण अधिनियमाचा उल्लेख केला आहे त्या ॲक्टची एक कॉपी काढली आहे मा.महापौरजी, याच्यामध्ये 16 मध्ये जे कलम दिलेले आहे त्याच्यामध्ये असे आहे काय?, नागपूर महापालिकेने किंवा कोणत्याही महानगरपालिकेने आपले वेगळे बॉयलॉज तयार करायला पाहिजे असे आहे काय?

डॉ.चिव्हाणेः— मा.महापौरजी, महाराष्ट्र नर्सिंग होम कायदयानुसार जे नियम आहेत. त्यानुसार नागपूर महानगरपालिकेत हॉस्पीटलचे रजिस्ट्रेशन झालेले आहे. मुख्यत्वेकरून विभागाद्वारे प्रचलित निकषाप्रमाणे 60 स्केअर फीट पर बेड मा. महापौरजी यांचे दिनांक 26.05.17 रोजी झालेल्या सभेतील निर्देशाप्रमाणे या निकषाप्रमाणे उपलब्ध असलेल्या जागेप्रमाणे खाटांची संख्येत वाढ करण्यात आली किंवा कमी करण्यात आले.

श्रीमती आभा पांडेः— मा.महापौरजी, 60 स्केअरफीट एरिया मिनीमम असायला पाहिजे हे कुणाचे नियम आहेत. हे नागपूर महानगरपालिकेने बनविलेले बॉयलॉज आहेत काय?

डॉ.चिव्हाणेः— मा.महापौरजी, महाराष्ट्र नर्सिंग होम ॲक्टमध्ये असा कुठेही स्केअरफीटचा उल्लेख केलेला नाही. परंतु दिनांक 26.05.17 रोजी झालेल्या सभेमध्ये मा.महापौरजी जे निकष आणि आयएनए त्यामध्ये उपस्थित होती. त्यामध्ये 60 स्केअर फीट मध्ये दोन खाटांमध्ये सहा फुटाचे अंतर असावे हे निकष ठरविण्यात आले होते.

श्रीमती आभा पांडेः— मा.महापौरजी, जेव्हा मुंबई सुश्रुषा गृहनिर्माण अधिनियम 1949 अंतर्गत मुद्दा क्र. 16 मध्ये जर नोंदविण्यात आले आहे तर नागपूर महानगरपालिकेने आपले नियम तयार करावयास पाहिजे. हे सांगत आहे, 60 स्केटर फीट पर बेड जे नियम सांगत आहे परंतु माझ्या माहितीप्रमाणे हे पुणे महानगरपालिकेचे नियम आहेत हे सत्य आहे काय?

डॉ.चिव्हाणेः—मा.महापौरजी, पुणे महानगरपालिकेचे 85 स्केटर फीट आणि पुणे चिंचवड महानगरपालिकेचे आता रिसेंटली माझ्या टीमने परवाच्या दिवशी आरोग्य विभागाला मा.आयुक्त यांच्या आदेशान्वये कुठल्या महानगरपालिकेची किती जागा आहे याचा खुलासा करून ठेवावा या करिता एक टीम कार्यरत होती आज ती मुंबईला आहे. पुणे महानगरपालिका 85 स्केटर फिट, पुणे चिंचवड 50 स्केटर फिट आणि मुंबई 60 स्केअर फिट अशी माहिती मिळाली आहे.

श्रीमती आभा पांडेः— मा.महापौरजी, म्हणजेच 60 स्केअर फीट हे वाढवून घेतले आहे. माझ्या माहितीप्रमाणे पुणे महानगरपालिकेने जे बनविलेले बॉयलॉज आहेत ते मी इंटरनेटवर डाऊनलोड करून आणलेले आहे. 60 स्केअर फीट हे त्यांचे नियम आहेत आणि त्यांनी आता 85 स्केटर फीट केले. म्हणजे पुणे महानगरपालिका जे जे करत जाईल ते ते आपण करणार काय?त्यांनी 60 केले त्या आधारावर करणार, आता त्यांनी 85 केले तर 85 च्या आधारावर करणार काय? जे मुंबई सुश्रुषा गृहनिर्माण अधिनियम 1949 ची जी गाईडलाईन आहे त्या आधारावर बॉयलॉज तयार करायला पाहिजे नाही काय? मा. आयुक्त महोदय आपण यावर प्रतिपादन दयावे.

आजपर्यंत महानगरपालिकेने बॉयलॉज तयार केलेले नाहीत ही सत्य परिस्थिती आहे. और इसी वजह से मा. महापौरजी,शहर के कुछ दवाखाने की यह परिस्थिती है । पिछले माह मेरी बच्ची की छोटीसी सर्जरी हुई, उस सर्जरी के लिए मैने अपने बच्ची को प्रायव्हेट हॉस्पीटल मे एडमीट किया । एक छोटे से रूम मे दो बेड थे, वो दो बेड के रूम मे बाहर ओपीडी चल रही थी । मेरे बेटी को ओटी से लेकर आये और वहां पर लिटाया । ओपीडी मे बहोत पेशंट थे, उनको टॉयलेट जाने की व्यवस्था नही थी तो सब पेशंट मेरी बच्ची के रूम मे आकर टॉयलेट जा रहे थे । तब से मेरे दिमाग मे वह उधेडबुन चलने लगी । जब नागपूर महानगरपालिका नोंदणीकृत करने के लिए स्विकृती देती है तो यह सारे नियम के पालन करती है की नही । मेरा सीधा से यह प्रश्न है के अगर 60 स्केअर फिट मे एक बेड रहना चाहिए। नागपूर महानगरपालिका के टीम ने जो सर्वे किया तो उसमे कितने दवाखाने है की जिसमे बढे हुए बेड की संख्या दिखी, बताईये ।

डॉ.चिव्हाणेः— मा.महापौरजी, सन 2015 ते सन 2018 मध्ये असे 13 हॉस्पीटल आहेत ज्यामध्ये खाटांची संख्या वाढविली आणि मग कमी करीत गेले.

महापौरः—आभाताई, प्रश्नोत्तर काय सुरू आहेत, तुम्हांला काय म्हणावयाचे ते सांगा ते उत्तर देतील. आपण कन्क्ल्युड करावे.

श्रीमती आभा पांडेः— मा.महापौरजी,माझी मुलगी जेथे ॲडमीट होती. पब्लिकला असा त्रास व्हायला पाहिजे असे तुम्हांला वाटते काय? कन्क्ल्युड करण्यास दोन मिनिटेही लागणार नाही मा. महापौरजी. आज 60 स्केटर फीट ची नोंदणीकृत करीत आहे जी स्पेस असते त्याला धरून सुध्दा त्या बेडची परमीशन यांनी दिलेली आहे. हा खुलासा होवू दया, हा खुलासा होवू देत नाही म्हणून चिव्हाणे साहेबांचे आणि सगळयांचे नाटक वाढलेले आहे. हे उघडकीस येवू दयावे मा.महापौरजी, किती दवाखाने होते ज्यांनी बेड वाढविले आहेत परंतु जागा वाढलेली नाही त्याची माहिती येवू दयावी.

डॉ.चिव्हाणेः— मा.महापौरजी, मी अगोदरच सांगितले, सन 2015 ते सन 2018 मध्ये असे 13 हॉस्पीटल आहेत ज्यामध्ये खाटांची संख्या वाढविली आहे परंतु सध्याची परिस्थितीमध्ये मी नावासकट सांगतो गणेश मेमोरियल फिजीओथेरेपी सेंटर कानफाडे नगर, 12 बेडकरिता निवेदन दिले होते रजिस्ट्रेशन दिलेले आहे. सन 2017—18 मध्ये दोन बेड कमी केले आहे.

श्रीमती आभा पांडेः— मा.महापौरजी, कमी केलेल्या दवाखान्याची नावे सांगू नका. ज्या दवाखान्यानी संख्या वाढविली आहे ती संख्या मला पाहिजे आहे. त्या हॉस्पीटलची नावे सांगा, कोणकोणत्या हॉस्पीटलने पर स्केअर फीट जागा न वाढविता बेडची संख्या वाढविली आहे.

डॉ.चिव्हाणेः— मा.महापौरजी, एकंदरीत 44 हॉस्पीटल आहेत. धंतोली,लक्ष्मीनगर झोनमध्ये या क्षेत्रामध्ये 44 हॉस्पीटल आहेत त्यांची यादी मा.सदस्यांना दिली आहे. उदाहरणार्थ, स्पंदन हॉर्ट इंन्स्टयुड ॲन्ड रिसर्च सेंटरने 2009—12 मध्ये 35 खाटांकरिता पंजीकृत केले होते सन 2012—15 मध्ये 40 बेड केले आणि 2015—18 मध्ये 40 बेड केले. परंतु मागच्या आठवडयात ते माझ्याकडे आले आणि बोलले की 5 बेड कमी करावयाचे आहे. आज नागपूर शहरातील डॉक्टर आरोग्य विभागाकडे येत आहे. त्यांनी सांगितले की, बेड वाढविले आहेत. आमच्या काही संस्था आहेत त्यांच्या रजिस्ट्रेशन पॅनलवर येण्याकरिता हे करावे लागते. आता त्यांचे बेड रिकामे करून उभे केले आहेत. त्यांनी बेड सुध्दा कमी केलेले आहेत. आणि जे वाढविलेले बेड आहेत त्याची लिस्ट मा. सदस्यांना दिलेली आहे.

श्रीमती आभा पांडेः— मा.महापौरजी, यांना डॉक्टरांनी केव्हा म्हटले, यांना हॉस्पीटलमधून केव्हा पत्र मिळाले. ज्या वेळेस नागपूर महानगरपालिकेची एक टीमने दौरा केला तो दौरा केल्यानंतर त्यांनी बजविले होते की हॉस्पीटलला 35 बेड ची परवानगी असतांना 40 बेड लावलेले होते. आज नागपूर शहर मेडीकल हब हो गया है । आसपास के जितने राज्य है उनसे नागपूर शहर मे पेशंट आत है । हमारे शहर के पेशंट के साथ साथ बाहर राज्य के आने वाले पेशंट की संख्या काफी बढ गई है मा महापौरजी । उस कारण डॉक्टर लोगो ने जहां देखो वहां पर बेड लगाना शुरू किया । मेरा यह कहना है मा.महापौरजी, आजतक जब से महानगरपालिका अस्तित्व मे आई तब से जो ॲक्ट है मुंबई सुश्रुषा गृहनिर्माण अधिनियम 1949 कलम 16 अंतर्गत जो कायदा आहे त्या अंतर्गत बॉयलॉज तयार करण्यात यावे. जर आपण बॉयलॉज नाही तयार केले तर डॉक्टर लोक बेडच वाढवत जातील. त्यांनी बेड वाढविले तर पेशंट लोकांचे हर्रासमेंट होईल. त्यांना चांगल्या सुविधा मिळणार नाही. नागपूर शहर मेडीकल हब होत आहे तर याचे नाव खराब होईल. नागपूर

महानगरपालिकेचे नाव सुध्दा खराब होईल. आपल्याला निवेदन करू इच्छिते की बॉयलॉज बनविण्याकरिता एक महिन्याचा यांना वेळ दयावी आणि एक महिन्यात पुर्ण बॉयलॉज तयार करून पुढच्या सभागृहात ठेवण्यात यावे व जे वाढलेले बेडची संख्या आहे अशा दवाखान्याची पुर्ण तपासणी करून त्याचा अहवाल तुमच्याकडे सादर करावा.

वरील चर्चेनंतर नागपूर शहरात नोंदणीकृत खाजगी दवाखान्यांच्या नुतनीकरण करीत असतांना (काही दवाखान्याच्या Bed संख्येत वाढ करीत असतांना) जे निकष आहेत हयावर सविस्तर चर्चा करण्याकरिता व योग्य निर्णयाकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून ज्या रूग्णालयाला वाढीव खाटांची (बेडस्) परवानगी देण्यात आली आहे. अशा रूग्णालयांची तपासणी करण्यात यावी आणि या संदर्भात कोणतेही धोरण/नियम महानगरपालिकेत नसल्यामुळे ते तयार करून आरोग्य समितीमार्फत सभागृहासमोर सादर करण्यात यावेत. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने मान्यता प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 98ः—</u> महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या वृत्ताची व्हिडीओ रेकॉर्डींग करणे. त्याचप्रमाणे स्थानिक दूरचित्रवाहिणीवर लाईव्ह प्रक्षेपण करण्यासंबंधी चर्चा करण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून या संदर्भात सर्वकष अभ्यास करून अहवाल सभागृहासमोर ठेवण्याकरिता सभागृहाच्या तीन जेष्ठ सदस्यांची समिती गठीत करण्याचे अधिकार मा. महापौरजी यांना प्रदान करण्यात येतात. या मा.सत्तापक्ष नेते श्री.संदीप जोशी यांनी केलेल्या सुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येतो. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने मान्यता प्रदान केली.

श्री. संदीप जोशीः—मा.महापौरजी, हा जो विषय सन्माननीय सदस्य श्री.धर्मपाल मेश्राम यांनी उपस्थित केला आहे. त्या विषयावर गेल्या दोन वर्षापूर्वी चर्चा झालेली होती. माझी विनंती आहे आपण सभागृहातील जेष्ठ सदस्यांची एक समिती अपाईंट करावी त्यांच्या माध्यमातून संपुर्ण विषयाचा अभ्यास करून या पटलावर ठेवण्यात यावा.

<u>ठराव क्रमांक 99ः—</u> नागपूर महानगरपालिकेच्या विविध विकास कामाकरिता शासनाच्या लोककर्म विभागाने तयार केलेल्या सी.एस.आर. दराचा आधार घेऊन नागपूर महानगरपालिकेत सी.एस.आर. दर ठरविण्यात येत असतात परंतु शासनाच्या सी.एस.आर. मध्ये काही कामाचे दर जसे खोदाई, गटारी व पावसाळी नाल्या व त्यांचे चेंबर आणि त्यावरील झाकणे, डी.आय. कवर, इमारत बांधकामामधील जुडाई, प्लास्टर, पेंटींग, कोटा फिटींग, जी.आय. पाईप, आर.एस.सी. ग्रेडवाईज कॉंक्रिटचे, कॉंक्रिट पंपींग, ट्रान्सपोर्टेशन लिड इत्यादी कामे म.न.पा. मध्ये फार मोठया प्रमाणात करावी लागतात व त्याचे दर कमी असल्यामुळे हया कामाकरिता ठरविण्यात आलेले सी.एस.आर. दराची पृथकरण (रेट ॲनेलेसीस) करणे गरजेचे आहे. करीता यावर चर्चा करुन योग्य निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून महानगरपालिकेचे मुख्य अभियंता, कार्यकारी अभियंता श्री.गायकवाड, श्री.तालेवार, उपअभियंता श्री.अमीन व कनिष्ठ अभियंता श्री.राजेंद्र जिवतोडे यांनी महानगरपालिकेचा सीएसआर तयार करून स्थापत्य समितीमार्फत सभागृहाच्या मंजूरीकरिता प्रस्ताव सादर करण्यात यावा. या मा.सदस्य श्री.प्रविण दटके यांनी केलेल्या सुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येतो. या महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने मान्यता प्रदान केली.

श्री.प्रवीण दटकेः—मा.महापौरजी,नागपूर शहरात आपण पीडब्लूडीचा सीएसआर जसाचा तसा अंमलात आणतो. अनेक प्रकरणात असे लक्षात आले आहे की सिवरलाईन असतील, गडरलाईन असतील वॉटरवर्क्सच्या

पाईपलाईनचे काम असतील. खुप सा–या गोष्टी असतील. आपल्या महानगरपालिकेच्या कामाच्या समस्या वेगळया असतील, पीडब्लूडीच्या वेगळया असतील. माझी विनंती आहे. सर्व गोष्टीचा अभ्यास करण्याकरिता आणि सीएसआर उत्तम व्हावा, एस्टीमेट चांगल्या पध्दतीने व्हावेत, त्यात कंत्राटदाराने चांगल्या पध्दतीने काम करावे. मा. मुख्य अभियंता जे चीफ इंजिनिअर आहेत त्यांनी महानगरपालिकेचे दोन–तीन अधिकारी, जे.ई यांची समिती करून चांगला अभ्यास करून स्थापत्य समितीच्या माध्यमातून सीएसआर परत सभागृहाच्या पटलावर ठेवावा आणि सभागृहाची परवानगी घ्यावी.

<u>ठराव क्रमांक 100</u>:– नागपूर महानगरपालिकेच्या मा. सदस्य आणि अधिकारी व कर्मचाऱ्यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती देण्याकरिता महानगरपालिकेच्या आयव्ययकात पुरेशी तरतूद करण्यात येत असते परंतु वैद्यकीय प्रतिपूर्तीची मागणी पहाता याकरिता करावयाच्या उपाययोजना संदर्भात चर्चा करुन निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून महानगरपालिकेचे मा.सदस्य, अधिकारी व कर्मचारी हयांना उपचाराकरिता रूग्णालय अथवा विशेष प्रकारच्या उपचाराकरिता अग्रीम राशीची मागणी आल्यास अशा प्रकारची अग्रीम राशीचा धनादेश हा संबंधित रूग्णालयाच्या किंवा डॉक्टरांच्या किंवा संबंधित विशेष तज्ञांच्या नावाने देण्यात यावा या मा.सदस्य श्री.प्रविण दटके यांनी केलेल्या सुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येतो. या महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने मान्यता प्रदान केली.

श्री.प्रवीण दटकेः– मा.महापौरजी, आपल्याकडे कर्मचा–यांसाठी आणि नगरसेवकांकरिता मेडीकलची प्रतिपुर्ती आपण करतो. मधल्या काळात त्या हेडमध्ये पैसे कमी होते म्हणून मा.आयुक्तांचे मी अभिनंदन करील की त्यांनी त्यातील अडचण दूर करून दिली. बहुतेक सर्व कर्मचा–यांची प्रतिपुर्ती झाली आहे. मी आपल्याला विनंती करेल की अनेक कर्मचा–यांना एडवॉन्स लागतो. तुम्हांला सांगायला अडचण नाही. महापौर कार्यालयासमोर एक गार्ड होता. त्याचे नाव आठवत नाही त्या माणसाची मुलगी महानगरपालिकेत दारोदारी फिरली की माझ्या वडीलांना या या हॉस्पीटलमध्ये ॲडमीट केले आहे मला पैश्याची गरज आहे. मा. मुख्यमंत्र्यांनी एक अशी योजना सुरू केली आहे की ज्या डॉक्टरकडे आपण पेशंट ॲडमीट करतो त्याच डॉक्टरच्या नावे चेक जमा होवून प्रतिपुर्ती करता येते. आपणही त्याच नियमाचा अवलंब करून ज्याला एडवॉन्सची आवश्यकता असेल त्याच डॉक्टरच्या नावाने खात्यात चेक जमा करून आपले कर्मचारी असतील, नगरसेवक असतील यांची मदत होईल आणि ख–या अर्थाने प्रतिपुर्तीचा फायदा होईल म्हणून या सुचनेसहीत हा विषय मंजूर करण्यात यावा.

<u>ठराव क्रमांक 101</u>:– नागपूर महानगरपालिकेकडुन बांधा, वापरा व हस्तांतरीत करा (बी.ओ.टी.) या तत्वावर म.न.पा. च्या जागेवर व्यापारी संकुल बांधण्याचे सन 2007 पासुन मानस होते. सध्या स्थितीत या संकुलाची बांधकामावर काय कारवाई करण्यात आली. उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी दि. 15.09.2017 रोजी प्रस्तावित असलेल्या महासभेमध्ये विषय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून अशा प्रकल्पासंदर्भात आणि बाजारामध्ये असलेल्या अतिक्रमणावर त्वरित कार्यवाही करण्यात यावी. या महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने मान्यता प्रदान केली.

श्री. संदीप सहारेः– मा.महापौरजी, सन 2007 ला नागपूर महानगरपालिकेचे महापौर श्री. नरेश गावंडे असतांना या ठिकाणी 6 मॉल बनविण्याचा विषय आणला होता. 2007 पासून तर आज 2017 पर्यंत एकदंरीत दहा वर्ष झालेली आहे. त्या शॉपिंग मॉलची स्थिती काय आहे त्याबद्दल प्रशासनाने माहिती दयावी.

महापौरः– प्रशासनाने माहिति दयावी.

श्री.चौगंजकर (कार्यकारी अभि. प्रकल्प):– मा. महापौरजी, पेंच प्रकल्प सेल मार्फत 6 ठिकाणी शॉपिंग कॉम्प्लेक्स बनविण्याचा प्रस्ताव आला होता. नेताजी मार्केट, बर्डी वॉटर वर्क्स्, गोकुलपेठ मार्केट, दाणागंज, जरीपटका आणि पाचपावली अशा 6 ठिकाणचा समावेश होता. 6 ठिकाणापैकी 2 ठिकाणी दाणागंज आणि जरिपटका ऑपरेटर नवीन टेंडर काढून बदलविण्यात आले आहे. जरीपटक्याचे काम 1500 स्केअर फीट करावयाचे होते त्यापैकी 1200 स्केटर फीटचे काम जवळपास तेथे पुर्ण झाले आहे. दाणागंजचे कामात काही

इश्यू होते ते दूर झाले आहे. उरलेल्या 4 ठिकाणचे काम त्यापैकी 3 ठिकाणी म्हणजे नेताजी मार्केट, गोकुलपेठ मार्केट आणि पाचपावली मार्केट येथे दुकानदार होते आणि सध्याही तेथे आहेत. त्या ठिकाणी त्यांनी अतिक्रमण केले होते. विभागामार्फत प्रयत्न करण्यात आले परंतु यश मिळाले नाही. ते दुकाने अजूनही तेथे आहेत. पुढे असे होवू नये असा प्रयत्न करण्यात येईल. त्या ठिकाणी शॉपिंग कॉम्प्लेक्स तयार करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

श्री.संदीप सहारेः— मा.महापौरजी, सर्वात पहिले यांचे अभिनंदन करतो की अतिक्रमण काढण्याकरिता प्रयत्न करण्यात आले. आमच्या महानगरपालिकेची जागा आम्ही त्यांना देत आहे आणि जेव्हा आम्हांला तेथे शॉपिंग कॉम्प्लेक्स बनवायचा आहे तेव्हा ते अतिक्रमण काढू देत नाही असे यांचे म्हणणे आहे. जेव्हा आम्ही दुकानदारांना जागा देतो हा एक परवानाप्रपत्र आहे. याच्यामध्ये स्पष्ट उल्लेख आहे हा परवाना योग्य कारणास्तव कोणत्याही वेळी रद्द करण्याचा अधिकार मनपाला राहील. परवाना धारकाला उजागर करण्याची, नुकसान भरपाई मागण्याची कोणत्याही प्रकारचा अधिकार राहणार नाही. परवाना रद्द केल्यानंतर महापालिकेचे अधिकृत अधिकारी महानगरपालिकेच्या कायदयानुसार किंवा तत्सम कायदयाअंतर्गत परवानाधारकाविरूध्द कार्यवाही करू शकतो. अशाप्रकारचा परवानप्रपत्र पारीत करूनही आजपर्यंत यांनी कोणत्याही प्रकारची कार्यवाही कां केली नाही. याच्यामध्ये आणखी एक सांगतो, पाचपावली मार्केटमध्ये ज्याला शनिवारी बाजार म्हणतात एकुण 163 दुकाने आहे आणि एक इतकी भयंकर गोष्ट आहे ज्या 163 दुकानदारांना जी जागा दिली त्या दिलेल्या जागेच्या व्यतिरिक्त त्या सर्व दुकानदारांनी अतिक्रमण केलेले आहे. आपण ज्या दुकानदारांना जागा दिली असे 163 दुकानदार आहेत ती 21441 चौ.फुट आहे सध्या ते वापरीत आहेत. 40763 चौ. फुट जागा वापरीत आहे. म्हणजे त्यांनी 19352 चौ.फुट जागेवर अतिक्रमण केलेले आहे. आमच्या जागेवर अतिक्रमण केले त्यांना भाडेपट्टीची जागा दिली त्याही जागेवर अतिक्रमण केले आमचा महसुल बुडाला. महानगरपालिकेचा महसुल देवून नाही राहिले, त्यांचे अतिक्रमण न काढता आम्ही त्यांना सुट दिली. याच्यामुळे शहरात जे 4 शॉपिंग कॉम्प्लेक्स तयार होणार होते ते तयार होवू शकले नाही. 12 तारखेच्या स्थायी समितीच्या बैठकीमध्ये ज्या एजन्सीने पैसे भरलेले होते त्यांची अनामत रक्कम एकुण 8 कोटी रू. वापस केली. एकीकडे महानगरपालिकेची जी आर्थिक स्थिती आहे ती दयनीय आहे. त्यातल्यात्यात जी अनामत रक्कम प्राप्त झाली होती ती आम्हांला वापस करावी लागते. त्याच्यामध्ये आणखी सांगतो, महानगरपालिकेच्या जागेवर दारूच्या दुकानाची परवानगी देता येत नाही त्यानंतरही तेथे बिअर, देशी विदेशी दारूच्या दुकानाना परवानगी दिली. ते चुकावर चुक करीत आहे आणि आम्ही हातावर हात ठेवून बसले आहोत. मला अशी शंका वाटते की कुठेतरी आमचे अधिकारी, कर्मचारी आणि ते दुकानदार यांच्यांत सेटींग झाली आहे काय? आमची ती जागा मोकळी करायला आम्हांला 10 वर्ष लागत असतील. त्या 10 वर्षामध्ये जे मॉल तयार होणार होते त्या एरियाचे आन बान शान ते बनणार होते ते धुळीस मिळाले आहे. त्यांनी अतिक्रमण केल्यामुळे मनपाला जो महसुलीचा घाटा झाला तो त्या दुकानदाराकडून भरून घेतला पाहिजे. जेथे जेथे अतिक्रमण केले आहे तेथे तेथे त्वरित काढले पाहिजे असे निवेदन मी करतो तसे निर्देश आपण कार्यालयाला दयावे.

<u>ठराव क्रमांक 102</u>ः— शहरात वेगवेगळया व्याधी व उपचाराकरिता डॉक्टर्स बाहय रुग्ण व्यवसाय करतात. त्यांना मनपाच्या आरोग्य विभागातर्फे तात्पुरत्या स्वरुपात नाममात्र शुल्क आकारुन परवानगी दिली जाते. मात्र, अनेक ठिकाणी नागरिकांना अशा व्यवसायापासुन त्रास होतो आहे. विशेषतः रहिवासी वा निवासी गाळयांमध्ये क्लिनिक वा इतर स्वरुपात वैद्यकीय व्यवसाय मोठया प्रमाणात सुरु आहे. यासाठी मनपाचे कुठलेही स्वतंत्र असे धोरण नाही. परिणामी, मनपाची अडचण होत आहे. शिवाय, मोठया प्रमाणात नागपूरकरांच्या तक्रारीही वाढलेल्या आहेत. या अंतर्गत शहराच्या हितासाठी नागरिकांच्या अडचणी दूर होण्यासाठी व संबंधित वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीलाही भविष्यात त्रास होऊ नये, यासंबंधी चर्चा करुन स्वतंत्र असे मनपा धोरण आखण्याची गरज आहे. करीता यावर चर्चा करुन निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून शहरातील नागरिकांना आणि संबंधित व्यावसायिकांना त्रासदायक होणार नाही अशा प्रकारचे धोरण ठरविण्याकरिता नियम, निकष, अटीशर्तीची माहिती घेवून आरोग्य समितीमार्फत एक महिन्याचे आंत प्रस्ताव सभागृहात सादर करण्यात यावा.या मा.सदस्य श्री.प्रविण दटके यांनी केलेल्या सुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येतो. या महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने मान्यता प्रदान केली.

श्री.प्रविण दटके:– मा.महापौरजी, मागच्या सभागृहात काही निर्णय घेतलेला होता. इंदोरा चौकात स्किममध्ये कोर्टात केस झाली होती. हायकोर्टाने जॉईंन इन्स्पेक्शनचा निर्णय दिला होता. शहरात एकीकडे अशी कम्प्लेंट झाली परंतु अशा अनेक तक्रारी आपल्याकडे आहेत. जवळपास 90 ठिकाणी आपण नोटीस देवून ठेवलेली आहे. आणि याबाबतीत आताच आभाताई पांडेने म्हटले. या बाबतीत जे नियम निकष अटीशर्ती असायला पाहिजे. अधिकार हे पुर्णपणे स्पष्ट व्हायला पाहिजे. झोन नोटीस देतो मग एडीटीपी विभाग सांगतो की हा अधिकार यांना आहे. सहा.आयुक्त सांगतात हा अधिकार आम्हांला नाही. मग हेल्थ विभागाकडे जातो, हेल्थ विभाग सांगते की आम्हांला रजिस्ट्रेशन देण्याचा अधिकार आहे वापस घ्यायचा अधिकार नाही त्याची फी ठरविण्याचा अधिकार नाही. मा. महापौरजी, इतर शहरामध्ये याबाबतीत स्पष्ट नियम आहे. कोणाची एनओसी घ्यायची, किती शुल्क आकारायचा, मग याचा वापर करीत असतांना आजूबाजूच्या नागरिकांना नुसन्स होवू नये या बाबतीतील कडक नियम आहेत. आपल्या महानगरपालिकेत कुठेही सोनोग्राफी सेंटर, कुठेही पॅथालॉजी सेंटर, कुठेही ब्लडबॅक यामुळे आजूबाजूच्या लोकांना याचा त्रास होत आहे. त्या भागातील वस्तीला याची गरजही होती. एकदम कार्यवाही करून बंदही पाडू शकत नाही. हे करीत असतांना उत्तम अटीशर्ती, नियम लावले तर नागरिकांनाही त्रास होणार नाही, डॉक्टरांनाही त्रास होणार नाही. एक जमेची बाजू म्हणजे या शहरातील वातावरण उत्तम राहील. जवळपास 1500 बाहय रूग्णालयाची नोंद आहे. परंतु आज या 1500 च्या व्यतिरिक्त हजारो क्लिनिक चालतात ज्यांचे कुठेलेही रजिस्ट्रेशन नाही. हे करीत असतांना वीसीपी आणि एनडीपी या कायदयानुसार आपण रजिस्ट्रेशन दिले. हे दिल्यानंतर त्यामध्ये सामान्य नागरिकांना ऑब्जेक्शन घ्यावयाचे असेल तर त्याचा महानगरपालिकेशी काही संबंध राहिलेला नाही. एखादया  अनलिगल बिल्डिंगला जर 52–53 ची नोटीस दिली तर त्याच्यावर कार्यवाहीच होत नाही. हे सगळेच मुद्दे आहेत नागरिकांची हरॅासमेंट होते, डॉक्टरांचे सुध्दा हरॅासमेंट होते. हे रजिस्ट्रेशन देतांना अटीशर्ती, नियम, शुल्क, कोणाची एनओसी घेतली पाहिजे याबाबतीत आपल्या आरोग्य समितीच्या माध्यमातून एक चांगली टीम तयार करून अटीशर्ती, नियम, निकष तयार करून सभागृहासमोर आणावे त्याचा सारासार विचार करून कोणत्याही घटकावर अन्याय करीत आहे असे वाटू नये. सगळया गोष्टीसाठी शिस्त ही असलीच पाहिजे. याकरिता अटीशर्ती, नियम, निकष मंजूर करून घ्यावेत. गरज वाटेल तर शासनाकडे पाठवावे. हे केल्याशिवाय या तक्रारी येतच असतील. धंतोली सारखा एरिया नेस्तनामुद होवून जाईल. एखादी फ्लॅट स्किम तक्रार करण्याकरिता पोलीस स्टेशनमध्ये सुध्दा जाईल. हे सांगायला अडचण नाही की एका मोठया वर्तमानपत्राच्या पत्रकाराला सुध्दा ही लढाई लढतांना हायकोर्टाप्रमाणे जावे लागले. हायकोर्टात आपले नियम अडचणीचे असल्यामुळे आपल्या वकीलाला नीट बाजु मांडता येत नाही. आपले सहा.आयुक्त ज्यांना कार्यवाही करावयाची आहे त्यांच्यासमोर नियमांचा प्रश्न आहे.आपला सॅग्शन डिपार्टमेंट योग्य पध्दतीने सॅग्शन देवू शकत नाही. त्यांचे नियमामध्ये सॅग्शन दयावे लागते. या सर्वांवर नियम निकष अर्टीशर्ती लावून चांगले बॅायलॉज तयार करावेत आणि सभागृहासमोर आणावेत. ते शासनाकडून मंजूर करून घ्यावेत एवढीच आपल्याला विनंती करतो.

श्री.तानाजी वनवे:–मा.महापौरजी, प्रवीणजी दटके यांनी एक चांगला विषय या ठिकाणी आणलेला आहे. हॉस्पीटलच्या बाबतीत आभापाई पांडे यांनी सुध्दा चांगला मुद्दा या ठिकाणी ठेवलेला आहे. या शहरामध्ये हॉस्पीटल कसे असावे, किती बेड असले पाहिजे, परवानगी कुणी दिली पाहिजे. याचे नियम निकष आपण बनविलेले नाही आणि त्याच्यामुळे या सगळया अडचणी आहेत. आताच आभाताई पांडे यांनी सांगितले की त्यांची मुलगी त्या ठिकाणी ॲडमीट होती त्या रूममधून सगळे लोक लॅट्रीन बाथरूमला जात होते. अशाप्रकारे अनेक डॉक्टरही माझ्याकडे अनेक दिवसात आलेत त्यांचे परवाना नोंदणीकरणासाठी आपल्या विभागाकडे दहावेळा बिचा–यांनी चकरा मारल्या. नुतनीकरण आमचे करून दयावे परंतु साधा बाबू आरोग्य विभागाचा जो स्वःतला महाराष्ट्राचा मुख्यमंत्री की चीफ सेक्रेटरी समजतो त्याने त्या तज्ञ डॉक्टरांना त्रास देण्याचे काम सातत्याने केले आहे. त्या बाबूची तेथून बदली करण्यात यावी. त्या बाबूच्या संबंधी अनेक तक्रारी लोकांमध्ये आहेत. त्याला वाटते मी पीएचडी आहे. मी ऑर्थपेड्रीक डॉक्टर आहे, मी एम.एस. आहे आणि माझ्याकडे सर्व डॉक्टर येतात. हे डॉक्टर अनपढ आहेत आणि मीच एक तज्ञ आहे. त्या विभागाचा जो कुणी बाबू असेल आरोग्य विभागाने पहिले त्याचे उत्तर दयावे. जो नुतनीकरणाच्या संबंधित डॉक्टर लोकांना चपराशी समजून

त्यांच्याशी व्यवहार करतो. खुजे की खुळे असे त्याचे नाव आहे.

डॉ. चिव्हाणेः— मा.महापौरजी, त्याचे मुकुंद खुजे असे नाव आहे.

श्री.तानाजी वनवेः—मा.महापौरजी, मुकुंद खुजे यांच्या अनेक तक्रारी आहेत. डॉक्टर, ऑर्थपेडीक, तज्ञ जे नुतनीकरणासाठी जातात. त्यांना तो सांगतो की तुम्ही नंतर या आमचे नियम बनवायचे आहेत. नियम बनविल्यानंतर आम्ही तुम्हाला नंतर सांगू असे म्हणून परत पाठवितो. ते परत गेल्यामुळे त्यांच्या रिनिव्हलसाठी लिगल ओपिनियम घेण्याची वेळ आली आहे. आपल्याकडे काही कायदा नाही. म्हणून अशा लोकांना जो खुजे आहे ताबडतोब त्याची बदली करून त्या ठिकाणी एक तज्ञ माणूस असेल त्याला त्या ठिकाणी बसवावे. ऑर्थपेडीक डॉक्टर, एम.एस., तज्ञ होण्यासाठी फार वेळ दयावा लागतो. असे नामवंत विद्वान डॉक्टर या नागपूर शहरात आहेत. यांनी या अशा डॉक्टरांना त्या बाबूकडे दोन—दोन तास उभे राहावे लागत असेल तर ही शोकांतिका आहे असे मला वाटते. त्या बाबूची पहिले बदली करावी. आणि बाकीचा विषय आहे त्याच्यामध्ये एक कमेटी करावी त्या कमेटी मध्ये सर्व पक्षीय सदस्यांना घ्यावे आणि आरोग्य समितीने सर्व लोकांचा सल्ला घ्यावा अशी मी विनंती करतो.

श्री.प्रविण दटकेः—मा.महापौरजी, डॉक्टर किती बिचारे आहेत याचावर माझा विश्वास नाही. त्यांचे मत वेगळे राहू शकते, माझे मत वेगळे राहू शकते. पण मा.महापौरजी नियमानुसार प्रत्येकाने परवानगी घ्याव्यात. कायदा आहे, कायदयानुसार परवानगी मिळवून घ्याव्यात. कोण खुजे आहे की खुळे त्याला येथून हाकलायचे की ठेवायचे हा नंतरचा मुद्दा आहे. पण जे डॉक्टर आहेत किंवा जे बाहय रूग्णालय चालवितात त्यांनी सर्व अटीशर्तीचे पालन केले पाहिजे. त्याच्या पार्किंगमध्ये जर ओपीडी चालत असेल ज्याचा लोकांना त्रास होत असेल तर तो डॉक्टर काही बिचारा नाही

श्री.तानाजी वनवेः— मा.महापौरजी, माझे म्हणणे मी काही कुण्या डॉक्टरची बाजू घेत नाही. आताच सांगितले की एका वरिष्ठ पत्रकाराचा विषय न्यायालयात गेला. परवानगी कोण देतो, परवानगी एक बाबू देतो. बाबूमध्ये हे सर्व प्राब्लेम निर्माण झाले आहे.

श्री.धर्मपाल मेश्रामः— पाईंट ऑफ आर्डर, मा. महापौर महोदया, हा विषय नागपूर शहरातील 25 लक्ष लोकसंख्या असलेल्या शहरासाठी एका विशिष्ट धोरण तयार करण्यासंदर्भातील विषय आहे. अटीशर्ती, नियम, निकष त्या संदर्भातील विषय आहे. मा.विरोधी पक्ष नेते हा विषय दुस—या दिशेला नेत आहेत. माझी सभागृहाला विनंती आहे. प्रवीण दटके यांनी सुचविलेल्या अनुषंगाने .......

श्री.तानाजी वनवेः— पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, मी विषय दुस—या दिशेला नेत नाही. चुकीची माहिती देत नाही. मी सांगितलेले आहे की याचा आराखडा आपल्याकडे तयार नाही. प्रवीण दटके यांनी चांगला विषय आणला आहे. मी आधीच सांगितलेले आहे आणि या विषयाशी माझे सहमत आहे. मुद्दा असा आहे आपल्याकडे पॉलिसी नसल्यामुळे आपले कडे असलेले जे कर्मचारी आहेत या शहरातील तज्ञ डॉक्टर त्यांना परवानगी चुकीची दयावी असे माझे म्हणणे नाही. निकष, नियम अटी असले पाहिजे. आपल्याकडे निकष नाहीत म्हणून हा सर्व प्रश्न निर्माण झाला आहे.

श्री.सतिश होलेः— मा. महापौरजी, आरोग्य विभागाच्या त्या कर्मचा—याच्या बाबतीत काही लेखी तक्रारी प्राप्त झाल्या आहेत काय? जर असतील तर त्या कर्मचा—याला निश्चितपणाने टार्चर केले पाहिजे. जर तक्रारी नसतील तर विनाकारण कुणाला टार्चर करता कामा नये.

महापौरः— विषयाचे विषयांतर करू नये.

श्री.मनोज सांगोळेः—मा.महापौरजी, शहरामध्ये अनेक दवाखाने विनापरवानगीने सुरू आहेत. ज्या भुखंडावर ते दवाखाने तयार झाले आहेत ते वापरीत आहेत. व्यावसायिक व निवासी किती आहे. निवासीच्या ठिकाणी जे दवाखाने सुरू आहेत. त्याच्यावर कोणती कार्यवाही करणार आहे आणि जे कमर्शियल वापराचे आहे त्याचे जे निकष ठरविता येईल त्या निकषानुसार परवानगी देणार आहोत. ही चांगली गोष्ट आहे. महापालिकेचा रेव्हेन्यु वाढेल. रेव्हेन्यु वाढविण्याच्या दृष्टीने जलद गतीने निर्णय घ्यावा अशी मी विनंती करतो.

श्री.प्रवीण दटकेः— मा.महापौरजी, सगळयाच्या भावना सारख्याच आहेत. यात काही वाद नाही. निकष, नियम ठरविले पाहिजे हे मी वारंवारं सांगत आहे. मागच्या सभागृहामध्ये विषय आणला होता, एमआरटीपी ॲक्ट जसा आहे तसा महानगरपालिकेचा ॲक्ट असला पाहिजे. बाकी महानगरपालिकेने बनविला आपण बनविला नाही तोही करून घ्यावा. दवाखान्याची गरज आहे त्यामुळे निकष, नियम ठरवून घ्यावे, मा.आरोग्य समितीच्या

माध्यमातून सभागृहात आणावे, त्याच्यावर चांगली चर्चा करून शासनाकडून मंजूर करून घ्यावे.

महापौरः—प्रवीण दटके, तानाजी वनवे,धर्मपाल मेश्राम मा.सदस्यांच्या भावना लक्षात घेता आरोग्य समितीने एक महिन्याच्या आत याचे धोरण ठरवावे. आणि सभागृहासमोर आणावे

**<u>ठराव क्रमांक 103</u>ः—** महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशीत सदस्यांची अहर्ता व नियुक्त्या) नियम 2012 कलम 3 व 4 अन्वये भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षातर्फे नामनिर्देशीत केल्या जाणाऱ्या 1 सदस्यासाठी श्री. तानाजी सुकलाजी वनवे यांनी नामनिर्देशीत केलेले श्री. जिचकार किशोर दामोदर हे उक्त नियमातील नामनिर्देशनासाठी अहर्ता पूर्ण करीत असल्याने श्री. जिचकार किशोर दामोदर यांचे नागपूर महानगरपालिके करीता नामनिर्देशीत सदस्य म्हणून नियुक्तीच्या शिफारसीचा प्रश्न सभागृहाने विचारात घेतला

श्री.संजय महाकाळकरः—मा.महापौरजी, विषय क्र. 74 मध्ये महाराष्ट्र महानगरपालिका नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्ती नियम 2012 कलम 3 व (4) अन्वये भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस पक्षातर्फे असा जो उल्लेख केला आहे. तो नस्तीमध्ये भारतीय राष्ट्रीय कॉग्रेसचे काही पत्र नस्तीमध्ये लागलेले आहे काय?

श्री.प्रफुल गुडधेः—मा. महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर, या ठिकाणी नामनिर्देशित सदस्याचा जो वाद होता. तो मा.उच्च न्यायालयामध्ये कालच निकाली निघाला आणि त्यामध्ये श्री. जिचकार यांचा जो अर्ज होता तो अर्ज ग्राहय धरण्यात आला आहे असा आदेश मा.उच्च न्यायालयाने दिला आहे त्यामुळे अशापध्दतीने कुठल्याही विषयावर नामनिर्देशित सदस्यांच्या विषयावर येथे पक्षांतर्गत जर काही वाद असेल तर त्या वादावर सभागृहामध्ये चर्चा करता येवू शकत नाही म्हणून मा.महापौरजी श्री.तानाजी वनवे गटनेता भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस यांनी जे नामनिर्देशित पत्र दिले आहे त्याला स्विकृती प्रदान करावी आणि त्या संदर्भातील काही आक्षेप असतील ते स्पेसिफिक आक्षेप या सभागृहात नोंदवावे एवढीच या निमित्ताने मी सभागृहाला विनंती करतो.

श्री.संजय महाकाळकरः—मा. महापौरजी, प्रफुल्लजीने सांगितल्याप्रमाणे हायकोर्टाने जो काही निर्णय दिला असेल हायकोर्टाचा निर्णय हा काही अंतिम निर्णय नाही. याच्या संबंधीत पुन्हा सुप्रिम कोर्टामध्ये दाद मागण्यासाठी जो काही कालावधी लागेल त्या कालावधीपर्यंत हा विषय स्थगित ठेवावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

श्री.प्रफुल गुडधेः—मा. महापौरजी, या ठिकाणी सन्माननीय उच्च न्यायालयाने आदेश दिल्यानंतर जर सुप्रीम कोर्टामध्ये जर जायचे असेल तर संबंधित याचिकाकर्त्याला निश्चितचपणे सुप्रीम कोर्टामध्ये जाण्याची मुभा आहे. मात्र जो काही निर्णय अंतिमता होईल त्या अंतिमता निर्णयाच्या अधिन हा संपुर्ण विषय मंजूर करण्यास कुठलीही हरकत नाही असे मला वाटते आणि समजा उद्या समजा नियुक्ती झाली आपण महानगरपालिकेत सार्वत्रिक निवडणुकीमध्ये निवडुन येतो ती इलेक्शन पीटीशन चॅलेंज होते चॅलेंज झाल्यानंतर अनेक नगरसेवकांचे नगरसेवक पद, अनेक आमदाराचे आमदार पद रद्द होते. म्हणून आम्ही अपील करणार आहोत म्हणून हा विषय स्थगित ठेवणे असे म्हणणे चुकीचे आहे. मा.महापौरजी, हा अत्यंत स्पष्ट आणि क्लिअर विषय आहे. याला आपण महानगरपालिकेच्या सभागृहामध्ये मंजूरी प्रदान करण्यात यावी ही विनंती करतो.

श्री.संजय महाकाळकरः—मा. महापौरजी, आपल्याला विनंती आहे कि, सुप्रीम कोर्टामध्ये जाण्यासाठी जो काही कालावधी असतो त्या कालावधीपर्यंत हा विषय स्थगित ठेवावा.

श्री.प्रफुल गुडधेः—मा. महापौरजी, स्थगित ठेवण्याचा हा विषय नाही. यात याचिकाकर्ते या सदनाचे सदस्य नाहीत. ज्याच्या नावाच्या संदर्भात हे म्हणून राहिले त्यांचे नाव या सदनाच्या विषयपत्रिकेमध्ये कुठेही उल्लेख नाही आणि स्पष्ट स्विकृती आहे आणि स्पष्ट स्विकृती असतांना हा विषय पेंडींग ठेवण्याचा काही कारण नाही. यांचे काही आक्षेप असतील तर आक्षेप नोंदवावे. या आक्षेपासह हा विषय मंजूर करावा.

श्री.संजय महाकाळकरः—मा. महापौरजी, हा जो विषय आहे यात स्पष्ट उल्लेख केला आहे भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस पक्षातर्फे आणि मला वाटते की नस्ती मध्ये भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस पक्षाचे कुठलेही पत्र लागलेले नाही.

श्री.प्रफुल गुडधेः—मा. महापौरजी, पाईंट ऑफ इन्फोमेशन, भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस पक्ष हा एक राजकीय पक्ष आहे आणि राजकीय पक्षाची स्थिती महाराष्ट्र महानगरपालिका अर्हता अधिनियमामध्ये निश्चित केलेली आहे. एक म्युनिसिपल पार्टी आहे सार्वत्रिक निवडणुका झाल्यानंतर त्या पक्षाचे परावर्तन हे म्युनिसिपल

पार्टीमध्ये होते. त्यामुळे भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पार्टी म्युनिसिपल पार्टी म्हणून मा.विभागीय आयुक्त कार्यालयामध्ये याची नोंद झालेली आहे आणि याचे गटनेते बहुमताच्या आधारावर मा.तानाजी वनवे यांची नियुक्ती झालेली आहे. त्यामुळे गटनेत्याने नामनिर्देशित केलेल्या सदस्याची नियुक्ती सभागृहात होते. मा. महापौरजी, यामध्ये अनेक गेटनेत्याच्या कोटयामध्ये आपण सिलेक्शन पध्दती सुरू केली. स्थायी कमेटीमध्ये किंवा विविध कमेटीच्या कोटयामध्ये स्थायी कमेटीमध्ये एखाद्या पक्षनेत्याने जर एखाद्या सदस्याचे नाव प्रस्तावित केले तर त्या पक्षाचा दुसरा सदस्य त्याचा विरोध करू शकत नाही मा.महापौरजी. मा.विरोधी पक्षनेत्याने उद्या एखाद्याचे नाव स्थायी कमेटी सदस्य म्हणून सुचित केले तर माझे नाव नाही म्हणून मी त्यांचा विरोध करू शकत नाही. म्हणून महापौरजी भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस म्युनिसिपल पार्टी आणि भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पार्टी राजकीय पार्टी स्वतंत्र आयडेंटेटी आहे आणि एकदा सार्वत्रिक निवडणुक झाल्यांनंतर महानगरपालिकेमध्ये भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पार्टी म्युनिसिपल पार्टी म्हणून त्याची स्वतंत्र नोंद आहे. स्वतंत्र नोंद असल्यामुळे त्या गटनेत्याने नामनिर्देशित केलेल्या सदस्याला स्विकृत करणे या सभागृहाला बंधनकारक आहे. म्हणून माझी विनंती आहे या नावाला आपण स्विकृत करावे.

श्री.संदीप सहारेः—मा.महापौरजी, मागील काही महिन्यामध्ये नागपूर शहरातील प्रगतीभवन येथे 16 सदस्यांनी एक गट तयार करून मा. तानाजी वनवे यांना त्या गटाचा पक्ष नेता बनविले आणि त्या गटामध्ये मी आहे. आणि ते बनविल्यानंतर त्याचे एक बॉयलॉज तयार झाले. ते बॉयलॉज विभागीय आयुक्त कार्यालयामध्ये रजिस्टर्ड करण्यात आले. त्या बॉयलॉज मध्ये समावेश करण्यात आले की सर्वसमावेशक नगरसेवकांच्या बैठकीनंतर नगरसेवकांसोबत विचार विनिमय केल्यानंतर जो निर्णय होईल तो निर्णय शेवटचा राहील. मा. महापौरजी, मला येथे आरोप करावेसे वाटते की किशोर जिचकार यांचे नाव नामनिर्देशित सदस्य म्हणून जेव्हा येथे दिले तेव्हा त्या गटाची कोणतीही मिटींग झालेली नाही. कोणत्याही नगरसेवकांना विश्वासात घेतले गेले नाही.

श्री.प्रफुल गुडधेः—मा. महापौरजी,पाईंट ऑफ आर्डर, या ठिकाणी मी आधीच स्पष्ट केले हे सभागृह पक्षांतर्गत वादावर चर्चा करण्याचा प्लेटफार्म नाही.

श्री.संदीप सहारेः—मा.महापौरजी, आपल्या गटाने विभागीय कार्यालयामध्ये रजिस्टर्ड केलेल्या बॉयलॉजविषयी सांगत आहे. आपण त्या गटाचे प्रतोद आहे व आपण घटना बनवितांना उल्लेख केला होता की सर्वसमावेशक सर्व नगरसेवकांना विश्वासात घेवून निर्णय घेण्याचा असा तो भाग आहे.

श्री.प्रफुल गुडधेः—पाईंट ऑफ इर्न्फोमेशन मा. महापौरजी, ही चर्चा निरर्थक आहे मा.महापौरजी, या ठिकाणी कायद्याच्या स्पष्ट तरतूदी आहेत. जे नाव या ठिकाणी ज्या गटाला जे कोटा आलेला आहे त्या गटनेत्याने ते नाव सुचित केले त्याला मंजूरी प्रदान करावयाची आहे. मला विश्वासात घेतले की मला विश्वासात घेतले नाही. मला विचाराले की विचाराले नाही हा भाग नाही, मा.महापौरजी.

श्री.संदीप सहारेः—मा.महापौरजी, जे बॉयलॉज दिले होते त्याच्यामध्ये टाकलेले होते म्हणूनच महापौरजी..

श्री.कमलेश चौधरीः—मा.महापौरजी, आपण जो गट बनविला आहे. तेव्हा व्हिडिओ रेकॉडिंग बनविली आहे. ...

श्री.तानाजी वनवेः— पाईंट ऑफ आर्डर, मा.महापौरजी, यामध्ये मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे पालन करावे आणि हा विषय मंजूर करावा अशी मी सभागृहाला विनंती करतो.आपण हा विषय त्वरित मंजूर करावा आणि ज्यांचे जे आक्षेप आहे ते आक्षेप आपण नोंदवावे.

श्री.मनोज सांगोळेः— मा.महापौरजी, आपण न्यायव्यवस्थेचा आदर करतो. तत्कालीन परिस्थिती वेगळी होती आणि आताची परिस्थिती वेगळी आहे.

श्री.कमलेश चौधरीः—मा.महापौरजी, पाईंट ऑफ इर्न्फोमेशन, जब प्रस्ताव दिया गया था तब पुरे के पुरे सदस्य व्हिडिओ रेकॉर्डिंग के अंदर है इस विषय को मंजूर करने मे कोई आक्षेप नही लेना चाहिए।

श्री.पुरूषोत्तम हजारेः— मा.महापौरजी, श्री.संदीपजी सहारे यांनी नाराजी व्यक्त केली असेल परंतु त्यांचे असे म्हणणे आहे की आम्हांला विचारले नाही. नाराजी व्यक्त करू शकतात परंतु त्यांची या विषयाला मंजूरी आहे.

श्री.मनोज सांगोळेः— मा.महापौरजी, त्यांना विचारले नाही, जेव्हा विचारतील तोपर्यंत हे प्रकरण स्थगीत ठेवण्यात यावे पुढच्या सभेत ठेवण्यात यावा मा.महापौरजी.अशी माझी विनंती आहे.

श्री.संदीप जोशीः— मा.महापौरजी, या विषयामध्ये जी काही काल हायकोर्टामध्ये पीटीशन होती ती या संपुर्ण प्रक्रियेवरती स्टे देण्याच्या संदर्भात होती ती पीटीशन हायकोर्टाने फेटाळली आहे आणि त्याच्यामुळे समोरच्याला सुप्रीम कोर्टामध्ये जायचे असेल तर ते निश्चितच जावू शकतात. सुप्रीम कोर्टात जो काही निर्णय होईल तो आपल्याला बांधील आहे. त्याच्यामुळे नियमाप्रमाणे कार्यवाही करून हा विषय मंजूर करावा.

वरील चर्चेनंतर महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशीत सदस्यांची अहर्ता व नियुक्त्या) नियम 2012 कलम 3 व 4 अन्वये भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षातर्फे नामनिर्देशीत केल्या जाणाऱ्या 1 सदस्यासाठी श्री. तानाजी सुकलाजी वनवे यांनी नामनिर्देशीत केलेले श्री. जिचकार किशोर दामोदर हे उक्त नियमातील नामनिर्देशनासाठी अहर्ता पूर्ण करीत असल्याने श्री. जिचकार किशोर दामोदर यांचे नागपूर महानगरपालिके करीता नामनिर्देशीत सदस्य म्हणून नियुक्तीच्या शिफारसीचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून या संदर्भात मा. उच्च न्यायालयात दाखल याचिका फेटाळली आहे आणि त्याच्यामुळे समोरच्याला सुप्रीम कोर्टामध्ये जायचे असेल तर ते निश्चितच जावू शकतात. सुप्रीम कोर्टात जो काही निर्णय होईल तो आपल्याला बांधील आहे. त्याच्यामुळे हायकोर्टाच्या दिशा निर्देशाप्रमाणे कार्यवाही करून हा विषय मंजूर करावा. या मा.सत्तापक्ष नेते श्री. संदीपजी जोशी यांनी केलेल्या सुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येतो. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने मान्यता प्रदान केली.

<u>**ठराव कमांक 104**</u> :— नागपूर महानगरपालिका, नागपूर महानगरपालिका, सभेचे खालील कार्यवृत्त कायम करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून कायम करण्यास मान्यता प्रदान केली.

1. म.न.पा. विशेष सभा दिनांक 17.06.2017 सकाळी 11.00 वाजता चे कार्यवृत्त
2. म.न.पा. स्थगित विशेष सभा दिनांक 19.06.2017 सकाळी 10.00 वाजता चे कार्यवृत्त
3. म.न.पा. स्थगित विशेष सभा दिनांक 19.06.2017 दुपारी 02.30 वाजता चे कार्यवृत्त

<u>**ठराव कमांक 105**</u> :— नागपूर महानगरपालिका, विशेष समित्यांच्या सभेचे खालील कार्यवृत्त कायम करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून कायम करण्यास मान्यता प्रदान केली.

1 स्थापत्य विद्युत व प्रकल्प विशेष समिती.
    1. मंगळवार दिनांक दि. 01.08.2017 दुपारी 02.30 वाजता चे कार्यवृत्त
2 वैद्यकिय सेवा व आरोग्य विशेष समिती
    1. मंगळवार दि. 08.08.2017 दुपारी 02.00 वाजता चे कार्यवृत्त
3 शिक्षण समिती
    1. शुक्रवार दि. 21.07.2017 सकाळी 11.00 वाजता चे कार्यवृत्त
4 महिला बाल कल्याण विशेष समिती
    1. बुधवार दि. 09.08.2017 सकाळी 11.00 वाजता चे कार्यवृत्त
    2. गुरुवार दि. 31.08.2017 सकाळी 11.30 वाजता चे कार्यवृत्त

यानंतर राष्ट्रगित होवून सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित करण्यांत आली.

**निगम सचिव**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**

**महापौर**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**